वाशिम, मंगळवार ११ मार्च २०२५ ◆ १ वर्ष - ४ ◆ अंक - ३३५ ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No. MAHMAR/२०२०/७९६७७ ◆ ISSN No. २५८२-९९७१ ◆ मुख्य संपादक : माधव आ. हिवाळे मो.नं. ९७६५३३२८९७

दैनिक epaper.bharatsangram.online

सत्याचा बुलंद आवाज

# भारत संग्राम




## लाडकी बहीणसाठी 36 हजार कोटींची तरतूद, शेतकरी कर्जमुक्तीवर मात्र अजित पवारांनी बोलणे टाळले

# अर्थसंकल्प 2025






•भारत संग्राम | प्रतिनिधी

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 2047 पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या संकल्पपूर्तीला बळ देणारा वर्ष 2025-26 चा अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सादर केला. 'महाराष्ट्र आता थांबणार नाही.., विकास आता लांबणार नाही...' असे सांगत शेती, शेतीपुरक क्षेत्रं, उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, पायाभूत सुविधा, सामाजिक विकास अशा अनेक क्षेत्रांसाठी भरीव तरतूद असलेला, 'विकसित भारत-विकसित महाराष्ट्रा'चे स्वप्न प्रत्यक्षात आणणारा हा अर्थसंकल्प आहे. यातून देशांतर्गत, विदेशी गुंतवणूक, रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी वाढतील. विधानसभा निवडणुकीत राज्यातील मतदारांनी व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरवण्यात अर्थसंकल्प यशस्वी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांचा अकरावा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना व्यक्त केला.**

उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार यांनी वर्ष 2025-26 चा अर्थसंकल्प आज विधानसभेत सादर केला. अर्थसंकल्पीय भाषणाच्या सुरुवातीलाच त्यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज, स्वराज्यजननी जिजाऊ माँसाहेब, छत्रपती राजर्षि शाहू महाराज, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीराव फुले, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या महामानवांचे स्मरण केले. शिखांचे नववे गुरु, श्री गुरु तेगबहादूर यांच्या हौतात्म्याचे हे 350 वे वर्ष आहे. स्वराज्य सौदामिनी महाराणी ताराबाई यांचे हे त्रिशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जयंतीवर्ष आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे त्रिशताब्दी जन्मवर्ष आहे. देशातील लोकशाहीचा आधारस्तंभ असलेल्या आपल्या संविधानाला 75 वर्षे पूर्ण झाली आहेत. याचाही कृतज्ञतापूर्वक उल्लेख त्यांनी केला. राज्यात गुंतवणुकीला पोषक वातावरण असल्याचे सांगत उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, औद्योगिक विकासात राज्य सदैव अग्रेसर असून थेट विदेशी गुंतवणूकीच्या बाबतीतही देशात अव्वल आहे. जानेवारी, 2025 मध्ये दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये राज्य शासनाव्दारे एकूण 63 कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. त्याव्दारे येत्या काळात 15 लाख 72 हजार 654 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून सुमारे 16 लाख रोजगार निर्मिती होईल, असा अंदाज आहे. वस्तू व सेवा कर कायदा लागू होण्यापूर्वी राज्यकर विभागातर्फे राबविण्यात आलेल्या विविध कायद्यांनुसार सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडे असलेली थकबाकीची तडजोड करण्याबाबतची अभय योजना उपमुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात जाहीर केली. सदर अभय योजनेचे नाव "महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यानी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम, 2025" असे असून या अभय योजनेचा कालावधी प्रस्तावित कायदा लागू झाल्याच्या दिनांकापासून दिनांक 31 डिसेंबर 2025 पर्यंत असेल. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

## ठळक वैशिष्ट्ये

- 1. राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्यानुसार राजकोषीय तूट स्थूल राज्य उत्पन्नाच्या ३ टक्क्यांपेक्षा कमी ठेवण्यातही शासन यशस्वी ठरले आहे. तसेच राज्याची महसुली तूट ही सातत्याने स्थूल राज्य उत्पन्नाच्या १ टक्क्यापेक्षा कमी राहिली आहे. सन 2025-26 ची राजकोषीय तूट 1 लाख 36 हजार 235 कोटी रुपये आहे.
- 2. आर्थिक सुधारणांच्या माध्यमातुन, भांडवली खर्चातील वाढीद्वारे विकासचक्रास चालना देऊन राज्याच्या विकास दरात वाढ करण्याचे उद्दीष्ट साध्य करण्याचे प्रयत्न आहेत. मुंबई महानगर प्रदेशाची अर्थव्यवस्था १४० बिलियन डॉलर वरुन सन २०३० पर्यंत ३०० बिलीयन डॉलर तर सन २०४७ पर्यंत १.५ ट्रिलीयन डॉलर पर्यंत नेण्याचे उद्दीष्ट आहे. मुंबई महानगर प्रदेशात हाती घेण्यात आलेल्या विविध पायाभूत सुविधांची कामे जसे की वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, बुलेट ट्रेन, मल्टीमोडल कॉरिडॉर, भुयारी मार्ग, मेट्रो प्रकल्प यामुळे हे क्षेत्र विकासाचे केंद्र ठरणार आहे.
- 3. विकसित भारत- विकसित महाराष्ट्र ही संकल्पना साध्य करण्याकरता "मेक इन महाराष्ट्र" व्दारे गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्राचे नवीन औद्योगिक धोरण आखण्यात येणार आहे. पुढील पाच वर्षाच्या कालावधीत ४० लाख कोटी रुपयांची गुंतवणुक व ५० लाख रोजगार निर्मिती अपेक्षीत आहे.
- 4. कृषी क्षेत्राच्या गेल्या वर्षीच्या निराशाजनक 3.3% विकास दराच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने शेतकऱ्यांना विविध योजना, कार्यक्रमांच्या माध्यमातुन आर्थिक सहाय्य दिल्यामुळे सन 2024-25 मध्ये कृषी क्षेत्राचा विकास दर 8.7% पर्यंत सुधारला. या विकास दरात सातत्याने वाढ करण्याकरता शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, शेती उत्पादनात मूल्य वर्धन, सिंचन सुविधा, विजेची गरज भागविण्यासाठी सौर ऊर्जा इत्यादी पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येतील.
- 5. केंद्र पुरस्कृत योजनांच्या माध्यमातून राज्यास अधिकाधिक केंद्रीय निधी प्राप्त व्हावा म्हणून विशेष प्रयत्न करण्यात येतील.
- 6. वस्तु व सेवा करातुन राज्यास होणाऱ्या उत्पन्नात दरवर्षी सुमारे १२ ते १४ टक्के एवढी वाढ होत आहे.
- 7. महत्वाकांक्षी योजनांना निधीचा सुरळीत पुरवठा होण्याकरता केंद्रीय सहाय्य, आतंरराष्ट्रीय वित्तीय संस्थांकडून सहाय्य , सार्वजनिक मालमत्तेचे मुद्रीकरण, योजनांचे सुसूत्रीकरण तसेच पायाभूत सुविधा गुंतवणूक न्यास सारखे नाविन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत.
- 8. राज्यातील महामार्ग, बंदरे, विमानतळे, जलमार्ग, बस वाहतूक, रेल्वे आणि मेट्रो या सर्व दळणवळण क्षेत्रांसाठी पुरेशी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली आहे.
- 9. दर्जेदार ग्रामीण रस्ते तसेच राज्य महामार्ग व जिल्हा रस्त्यांना सर्वाधिक आर्थिक पाठबळ देण्यात येत आहे.
- 10. सर्वांसाठी घरे हे उद्दीष्ट येत्या ५ वर्षात साध्य करण्यासाठी राज्याचे नवीन गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. ग्रामीण घरकुलांसाठी 15 हजार कोटी तर शहरी आवास योजनांसाठी ८ हजार १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
- 11. नव्याने जाहीर केलेल्या योजनांसाठी पुरेशा तरतुदी केलेल्या आहेत. राज्याच्या वार्षिक योजनेत ६२ हजार ५६० कोटीची म्हणजेच सुमारे ३३ टक्के इतकी भरीव वाढ करण्यात आली असून अनुसूचीत जाती घटक योजनेच्या तरतुदीत ४२ टक्के, आदिवासी घटक योजनेच्या तरतुदीत ४० टक्के वाढ करण्यात आली आहे.

## गुलाबी जॅकेटवाले लाडक्या बहिणींना विसरले

- ज्यांच्या मतांवर महायुती सरकार सत्तेत आले त्याच लाडक्या बहिणी, शेतकरी, वंचित, आदिवासी यांचा महायुतीने विश्वासघात केला. निवडणुकी आधी गुलाबी जॅकेट घालून फिरणारे आता गुलाबी जॅकेट ही विसरले आणि लाडक्या बहिणींना विसरले अशी टीका काँग्रेस विधी मंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. महायुती सरकारचा पहिला अर्थसंकल्प आज अर्थमंत्री अजित पवार यांनी मांडला. पण या बजेट मध्ये लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याची घोषणा करण्यात आलेली नाही, लाडक्या बहिणींचा उल्लेख ही भाषणात नाही. एकीकडे लाडकी बहिण योजनेत वेगवेगळे निकष लावून महिलांना अपात्र केले जात आहे दुसरीकडे निधी वाढवून दिला नाही यावरून तिजोरीत खडखडाट असल्याचे स्पष्ट आहे असे विधी मंडळ नेते वडेट्टीवार म्हणाले.

## औद्योगिक वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत कमी होतील


- महावितरण कंपनीने येत्या 5 वर्षांसाठी वीजेचे दर निश्चित करण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर केला आहे. ऊर्जा क्षेत्रातील नियोजन व कमी दराच्या हरित ऊर्जेच्या खरेदीमुळे येत्या पाच वर्षात वीज खरेदी खर्चामध्ये १ लाख १३ हजार कोटी रुपयांची बचत होईल, असा अंदाज आहे. यामुळे, राज्यातील औद्योगिक वीज दर इतर राज्यांच्या तुलनेत कमी होतील.

## सात कलमी कृती आराखडा

- महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मंत्रालयीन विभाग तसेच क्षेत्रीय कार्यालयांसाठी 100 दिवसांचा सात कलमी कृती आराखडा तयार करण्यात आला. या कृती आराखड्यात संकेतस्थळांचा विकास, सुलभ जीवनमान, स्वच्छता, जनतेच्या तक्रारींचे निवारण, कार्यालयातील सोयीसुविधा, गुंतवणुकीचा प्रसार, क्षेत्रीय कार्यालयांना भेटी आदींचा समावेश करण्यात आला आहे. या कार्यक्रमामुळे प्रशासन कार्यक्षम, पारदर्शक, गतिशील, लोकाभिमुख होऊन राज्य प्रगतीच्या शिखरावर जाईल, याची खात्री आम्हाला आहे. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन त्रयस्थ संस्थांकडून करवून घेऊन उत्कृष्ट काम करणाऱ्या कार्यालयांचा गौरव करण्यात येणार आहे.



## घोषणा होतील मात्र, पूर्ण होणार नाही - अंबादास दानवे



- आर्थिक पाहणी अहवालाचा अभ्यास केला तर सरकारच्या वतीने केलेल्या कोणत्याही घोषणा पूर्ण होतील, असे वाटत नाही. घोषणा होऊ शकतात मात्र त्या पूर्ण होणार नाहीत, असा दावा विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी केला आहे. राज्याची आर्थिक स्थिती डबघाईला आलेली आहे. देशात सर्वात जास्तीत जास्त मदत ही उत्तर प्रदेश आणि बिहारला मिळते. मात्र सर्वात जास्त उत्पन्नाचा वाटा असून देखील इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राला कमी सहाय्य मिळत असल्याचा दावा दानवे यांनी केला आहे. उद्योग व्यवसाय असो किंवा शेती आपण सर्व क्षेत्रात मागे गेलो असल्याचे दानवे यांनी म्हटले आहे. कंत्राटदारांचे हजारो कोटी रुपयांचे देणे थांबलेले असल्याचा आरोपही त्यांनी केला.

## अर्थसंकल्प अत्यंत महत्त्वाचा राहील - अमोल मिटकरी



- अजित पवार हे 11व्यांदा अर्थसंकल्प मांडणार आहेत. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकरी, लाडक्या बहिणी, युवा या सर्वांना तसेच शेतकऱ्यांना केंद्र बिंदू मानून दोन्ही सभागृहात अर्थसंकल्प मांडला जाणार असल्याचे अमोल मिटकरी यांनी म्हटले आहे. या अर्थसंकल्पातून निश्चितच या महाराष्ट्राचे आशादायी चित्र उजाडेल असे देखील ते म्हणाले. महायुती सरकारला केंद्र सरकारचे पाठबळ असल्यामुळे आजचा अर्थसंकल्प हा सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा राहील, असा दावा मिटकरी यांनी केला आहे

## घोषणा पूर्ण कराव्या लागतील - संजय राऊत



- राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालात महाराष्ट्रात कसा कर्जाच्या ओझ्या खाली आहे, हे दिसून येत आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीची गंभीर स्थिती समोर आली आहे. त्यामुळे या राज्याच्या आर्थिक परिस्थितीबाबत आम्हाला चिंता वाटत असल्याचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. मात्र, राज्यकर्ते किंवा सत्ताधारी यांनी मते विकत घेण्यासाठी ज्या पद्धतीने सरकारी तिजोरीचा वापर किंवा गैरवापर केला, तो इतक्या टोकाला गेलेला आहे की, आता त्यांना मागे हटता येणार नाही. ज्या घोषणांवर तुम्ही मते विकत घेतली, त्या घोषणा तुम्हाला या अर्थसंकल्प पूर्ण कराव्या लागतील, अशी मागणी संजय राऊत यांनी केली आहे.

## 100 टक्के पिक पाहणी करू शकतो - फडणवीस



- आपण 100 टक्के पिक पाहणी करू शकतो, असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. राज्यात 93 टक्के पेक्षा जास्त भागांवर मोबाईल नेटवर्क मिळते. केवळ पाच ते सहा टक्के डोंगरी भाग सोडला तर सर्व भागात नेटवर्क असल्याचा दावा फडणवीस यांनी केला आहे. तरी देखील सॅटॅलाइट, ड्रोन आणि ऑफलाइन पाहणी आपण करू शकतो. त्या दृष्टिकोनातून सरकार प्रयत्न करत असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. विधानसभेत विचारण्यात आलेल्या प्रश्नांना मुख्यमंत्री उत्तर देत होते.मात्र, ई पिक पाहणी पूर्ण होत नाही याला यंत्रणा देखील जबाबदार असल्याचे फडणवीस यांनी मान्य केले.

अग्रलेख

# योगायोग आयोग!

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर निवडणूक आयोग या यंत्रणेविषयी जो शंखनाद सुरू आहे त्यास पूर्णपणे आयोग जबाबदार ठरतो. न्याय नुसता करून चालत नाही; तो केला जात आहे असे इतरांस दिसणेही तितकेच आवश्यक असते असे न्यायपालिकेविषयी म्हटले जाते. न्यायदानातील नि:स्पृहता जितकी महत्त्वाची तितकेच न्यायदानाचे कर्तव्य करणाऱ्यांचे वर्तन नि:स्पृह आहे असे इतरांस दिसणे महत्त्वाचे असते; असा त्याचा अर्थ. तो निवडणूक आयोग या यंत्रणेसही तंतोतंत लागू पडतो. निवडणूक आयोग वास्तविक न्यायपालिकेप्रमाणे स्वतंत्र आणि सार्वभौम यंत्रणा आणि तिचे प्रमुख निवडणूक आयुक्त हे एक घटनात्मक पद. आपल्या देशात अशी घटनात्मक पदे हाताळणाऱ्यांस एक वेगळे संरक्षण असते. उदाहरणार्थ न्यायाधीश, निवडणूक आयुक्त वा राज्यपाल इत्यादी. या यंत्रणा ही सरकारी खाती नाहीत. तशी ती निदान कागदोपत्री तरी नसल्यामुळे त्यांना सत्ताधीशांपुढे झुकावे लागत नाही. त्यामुळे या घटनात्मक यंत्रणांतील व्यक्तींनी ताठ मानेने आपल्या जबाबदाऱ्यांचे निर्वहन करणे अपेक्षित असते. तथापि अलीकडे अनेक महत्त्वाच्या पदांवरील व्यक्तींचे वर्तन त्यांनी आपापले अधिकार कसे म्यान करून ठेवले आहेत हे दाखवून देणारे असते. अशा पदांवरील व्यक्तीदेखील सत्ताशरणतेत धन्यता मानताना दिसतात. सरन्यायाधीशपदावरून निवृत्त झाल्यानंतर एखादे आयते लोकप्रतिनिधित्व स्वीकारणे, राज्यपालपदावर समाधान मानणे वा मुख्य निवडणूक आयुक्ताने निवृत्तीनंतर क्रीडामंत्री होणे इत्यादी काही दाखले या संदर्भात देता येतील. यामुळे या सत्ताशरणांचे काय भले झाले ते झाले असेल. पण या अशांनी निरोगी लोकशाहीसाठी महत्त्वाच्या यंत्रणांची मात्र माती केली यात शंका नाही. निवडणूक आयोग ही यातील प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालेली एक यंत्रणा. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालानंतर या यंत्रणेची छी-थू होत असेल तर त्याचे 'श्रेय' संपूर्णपणे याच यंत्रणेच्या पूर्वसुरींचे. त्यांच्या कृत्यांचे माप त्यांच्या पदरात टाकणे आवश्यक. याचे कारण विद्यमान निवडणूक आयोगाचे वर्तन या यंत्रणेच्या प्रतिष्ठेत भर घालणारे आहे असा दावा सत्ताधारीही करण्यास धजावणार नाहीत. या तीन सदस्यीय आयोगातील एका सदस्याच्या नियुक्तीसाठी निवडणूक आयोगाने दाखवलेल्या अतिउत्साहावर सर्वोच्च न्यायालयानेही प्रश्न निर्माण केले होते. तरीही आपले वर्तन कसे आहे इत्यादी विचार करण्याची गरज आयोगास वाटली नाही. गेल्या दोन वर्षांत खरे तर आपली नि:स्पृहता दाखवून देण्याची आणि आपल्या पाठीस कणा नामक अवयव असल्याचे सिद्ध करून दाखवण्याची संधी आयोगास अनेकदा मिळाली. पण आयोगाने त्याची माती केली. विशेषत: शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर, फुटलेल्या गटांनाच मूळ पक्ष ठरवण्याची आयोगाची आततायी कृती आयोग नेमका कोणासाठी काम करतो असा प्रश्न निर्माण करणारी होती. सर्वोच्च न्यायालयाने त्या आधी विधिमंडळ पक्ष आणि पक्ष संघटना यांतील फरक स्पष्ट केला होता आणि तरीही आयोगाने त्याकडे दुर्लक्ष करत सत्ताधाऱ्यांस जे हवे होते ते केले. आमचा निर्णय आणि सत्ताधाऱ्यांचे हित हा केवळ योगायोग होता, असा साळसूद खुलासा आयोग करू शकतो. तसा तो करेलही. पण त्यावरून या मंडळीचे सराईतपण तेवढे दिसून येईल. कारण असे योगायोग सद्या:स्थितीत अनेक घडताना दिसतात. उदाहरणार्थ लोकसभा निवडणुका सात टप्प्यात घेणे, त्याचवेळी महाराष्ट्रातील मतदानही अनेक फेऱ्यांत ठेवणे आणि राज्यातून फक्त ४८ लोकसभा सदस्यांसाठीचे मतदान एका फेरीत न घेऊ शकणाऱ्या आयोगास अवघ्या चार महिन्यांत २८८ उमेदवार एकाच फेरीत मतास घेण्याचा आत्मविश्वास येणे अथवा हरयाणा आणि महाराष्ट्र राज्यांतील विधानसभा निवडणुकांत जमेल तितके अंतर राहील याची खबरदारी घेणे ही आयोगाच्या 'नि:स्पृह' कारभाराची काही ताजी उदाहरणे. या प्रत्येकामागे एक योगायोग दडलेला आहे. जसे की लोकसभा निवडणुका सात टप्प्यांत घेण्याच्या निर्णयामागे '४०० पार'चा नारा देणाऱ्या आणि तसा आत्मविश्वास असणाऱ्या नेत्यांस सर्वत्र प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळण्याचा योगायोग. महाराष्ट्रातही ४८ जागांसाठीचे मतदान अशा टप्प्याटप्प्याने घेण्यामागे सुरक्षा यंत्रणांवरील ताण हा योगायोग. तसेच जितके टप्पे अधिक तितका सत्ताधीशांचे मताधिक्य घटण्याचा वेग अधिक हे लक्षात आल्यानंतर २८८ जागांसाठीचे मतदान एकाच फेरीत घेऊन टाकण्याचा योगायोग... इत्यादी. वास्तविक याच आयोगाच्या पूर्वसुरींनी शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांचा मताधिकार काढून घेण्याची आणि त्याआधी न्यायालयाने शिवसेनेचे उमेदवार डॉ रमेश प्रभु यांची निवडणूक रद्दबातल करण्याची हिंमत दाखवली होती. हा फार जुना इतिहास नाही. त्यामागील कारण होते शिवसेनाप्रमुखांनी निवडणूक प्रचारात घेतलेला धर्माचा आधार. पण आपल्याच पूर्वसुरींच्या कृत्याचा विसर विद्यमान निवडणूक आयोगास नंतर अनेकदा झाला, हाही तसा योगायोगच. कारण अलीकडे तर निवडणुकांत उघडउघडपणे धर्मभावना भडकवणारी विधाने केली जातात आणि सर्वोच्च सत्ताधीशही त्यात मागे नसतात. पण अलीकडच्या निवडणूक आयोगाच्या कानी काही पडत नाही आणि दृष्टीनेही ते बहुधा दिव्यांगच असावेत, हाही योगायोगच. कारण या मुद्द्यांवर आयोगाने कोणावर काही कारवाई केल्याचे उदाहरण नाही. तसेच विरोधकांविरोधात आचारसंहिता भंगाच्या तक्रारी सत्ताधाऱ्यांकडून आल्यास त्याची दखल घेण्यात जी त्वरा आयोग दाखवतो ती विरोधी पक्षीयांच्या तक्रारींबाबत दिसत नसेल तर त्यामागेही योगायोग याखेरीज अन्य काही कारण नसणार. या योगायोगांस नागरिक आणि राजकीय पक्ष सरावलेले असूनसुद्धा मतदानातील गैरव्यवहार वा मतदान यंत्रांतील कथित फेरफार यावर विरोधी पक्षीयांकडून आरोप केले जात असतील तर तो मात्र खचितच योगायोग नाही. त्यामागील कारण लक्षात घ्यायला हवे. कारण यावेळी निवडणुकीत कोणतीही लाट नव्हती. तरीही लाटेतील निवडणुकांपेक्षा अधिक एकतर्फी मतदान झालेले असल्याने विरोधकांनी त्याबाबत संशय घेणे अतर्क्य नाही. या निवडणुकीतील विजेता पक्षदेखील या विजयाच्या आकाराने चमकून गेला असेल तर पराभूत विरोधकांस बसलेला धक्का नैसर्गिकच ठरतो. हा संशय त्यामुळे जसा 'वाढीव' मतदानाचा असू शकतो तसाच मतदान यंत्रांबाबतही तो असणे गैर नाही. अशावेळी आयोगाने तो किती खरा, किती खोटा हे सिद्ध करून दाखवण्याची जबाबदारी स्वत:हून घ्यायला हवी. तेवढा पोक्त मोठेपणा आयोगाने दाखवायला हवा. नियामक यंत्रणांचे खांदे रुंद असावे लागतात आणि हृदय विशाल असावे लागते. रुंद खांद्यावर नियमनाची नैतिक जबाबदारी असते आणि विशाल हृदय टीका सामावून घेण्यासाठी आवश्यक असते. सध्या फक्त निवडणूक आयोगच काय, सगळ्याच नियामक यंत्रणांचे घोडे पेंड खायला जाते ते याच मुद्द्यावर. या नियामकांचे शील हाच खरा काळजीचा विषय. त्यास तडा गेलेला असल्यामुळे या आयोगाविषयी असे प्रश्न निर्माण होतात आणि आयोगाच्या कामगिरीबाबत अनेकांस शंका येते. प्रामाणिकपणा, नि:स्पृहता ही एकदाच सिद्ध करून आयुष्यभर मिरवण्याची गोष्ट नाही. सुदृढ शरीरासाठी जसा व्यायाम एकदाच करून चालत नाही; त्यात नियमितपणा लागतो, तसेच हे. हे कष्ट कसे नियमितपणे उपसावे लागतात हे टी. एन. शेषन यांच्यासारख्यांनी दाखवून दिलेले आहे. ते १९९० ते १९९६ या काळात मुख्य निवडणूक आयुक्त होते. म्हणजे आज सव्वादोन तपानंतरही सर्वांस फक्त शेषन यांचेच स्मरण होत असेल तर तो काही योगायोग खचितच नव्हे. यात बदल झाला नाही आणि निवडणूक आयोग फक्त योगायोग आयोगच राहिला तर ते लोकशाहीच्या गळ्यास नख लावणे असेल, हे निश्चित.

# शिशुपालगड

भारताच्या ओडिशा राज्यातील एक प्राचीन स्थळ. ते भुवनेश्वर या राजधानीपासून ९ किमी. अंतरावर आहे. गंगावती नदीने वेढलेल्या या तटबंदीयुक्त नगराचा आकार १.१ चौ. किमी. इतका असून, प्रत्येक दिशेस दोन-दोन अशी एकूण ८ भक्कम प्रवेशद्वारे आहेत. या शहराच्या तटबंदीची बाहेरून उंची ९ मी. इतकी आहे. या स्थळाचे उत्खनन सन १९४८-४९ साली बी. बी. लाल यांनी केले होते. सदर उत्खनन भारतातील स्वातंत्र्यानंतरचे पहिले मोठे उत्खनन होते. लाल यांनी पश्चिम दिशेच्या प्रवेशद्वाराचे आणि लगतच्या परिसरात उत्खनन केले, त्यात त्यांना विविध रंगाची मृद्भांडी, भाजलेल्या मातीच्या मूर्ती, धातूची नाणी आणि इतर पुरावशेष प्राप्त झाले. सदर पुरास्थळाचा काळ त्यांनी इ. स. पू. दुसरे शतक ते इ. स. चौथे शतक असा निश्चित केला. या पुरास्थळाचे पुरातत्त्वीय आणि ऐतिहासिक महत्त्व, आंतरिक स्थापत्य, तत्कालीन नगरवासियांची जीवनपद्धती, घरांची रचना आणि स्थळाचा कालानुक्रमिक विकास इत्यादी बाबी जाणून घेण्याच्या दृष्टीने येथे पुरातत्त्व विभाग, डेक्कन कॉलेज पुण्याचे रबिन्द्र कुमार मोहंती आणि कॉटसेन पुरातत्त्वीय संस्था आणि कॅलिफोर्निया विद्यापीठ (लॉस अँजेल्स, अमेरिका) येथील मोनिका स्मिथ यांच्या संयुक्त विद्यमाने पुन्हा उत्खननकार्य हाती घेण्यात आले (२००५-०९). तत्पूर्वी तटबंदीयुक्त शहराचा विशाल आकार आणि तत्कालीन सुनियोजित यंत्रणा लक्षात येण्याकरिता येथे विस्तृत भौगोलिक सर्वेक्षण करण्यात आले (२००२-०५). सदर उत्खनन हे तटबंदीच्या आत पश्चिमेकडे, पूर्वेकडील तटबंदीच्या वर, स्तंभ असलेल्या परिसरात, उत्तरी प्रवेशद्वार व लगतच्या परिसरात आणि तटबंदीच्या बाहेर करण्यात आले. उत्खननात प्राप्त पुराव्यांनुसार आणि कालमापन तिथीनुसार या स्थळाची प्राचीनता इ. स. पू. सहाव्या-सातव्या शतकापर्यंत गेली. या प्राचीन नगराविषयी अनेक नवीन बाबी उघडकीस आल्या. शिशुपालगडचा कालानुक्रमिक इतिहास स्तरशास्त्राप्रमाणे तीन कालखंडांमध्ये अनुक्रमे १) प्रारंभिक ऐतिहासिक काळ (इ. स. पू. आठवे ते इ. स. पू. चौथे शतक), २) ऐतिहासिक काळ (इ. स. पू. तिसरे ते इ. स. चौथे शतक) आणि ३) उत्तर ऐतिहासिक



काळ (इ. स. पाचवे शतक) मध्ये विभागला आहे. प्रारंभिक ऐतिहासिक काळामध्ये लोक उच्च प्रतीची, उत्कृष्ट भाजणीची काळ्या आणि तांबड्या रंगाची मूठ असलेली मृद्भांडी वापरत होते. तटबंदीच्या बाहेरील उत्खननात मातीचा भराव घातलेले तीन वर्तुळाकार आकाराचे दगडी अवशेष प्राप्त झाले. तटबंदीच्या बाहेर घराचे अवशेष प्राप्त झाले आहेत जे तटबंदीच्या आतल्या भागापेक्षा आकाराने मोठे आणि मोकळे आहेत, ज्यामध्ये मृद्भांडी, धातू इत्यादी पुरावशेष प्राप्त झाले. नगराच्या तटबंदीचे निर्माणकार्य इ. स. पाचव्या शतकापूर्वी झाले होते, असे या उत्खननामुळे लक्षात आले. शिशुपालगडच्या दुसऱ्या ऐतिहासिक कालक्रमात वसाहतीमध्ये बराच बदल दिसून येतो. या काळात, लोकांच्या घरांच्या रचनेमध्ये बदल दिसून येतो. घरबांधणीकरिता पहिल्यांदा भाजलेल्या विटांचा वापर दिसून येतो आणि छताकरिता भाजलेले कवेलू वापरात आल्याचे पुरावे प्राप्त झाले. या काळात, लोकांच्या आवडीनिवडी मध्येही परिवर्तन दिसून येते. यांमध्ये रूलेटेड, काळी चकाकीयुक्त आणि तांबडी चकाकी असलेल्या मृद्भांड्यांचा वापर, लोकांच्या वैयक्तिक अलंकारामध्ये वृद्धी आणि गतकाळापेक्षा नवीन वस्तू दृष्टिगोचर होतात. सांस्कृतिक स्तर क्रमातील हा बदल शिशुपालगड येथील तत्कालीन काळातील सामाजिक आणि आर्थिक विकास दर्शवतो. महत्त्वाचे म्हणजे याच काळात मौर्य सम्राट अशोक याने कलिंगवर आक्रमण केले होते, परंतु त्याच्या विजयाने शिशुपालगड येथील तत्कालीन परिस्थितीवर कुठलाही परिणाम झाल्याचे दिसून येत नाही. इ. स. पू. पहिल्या शतकातील चेदी नरेश खारवेल याच्या उदयगिरी येथील हाथीगुंफा अभिलेखात वादळाने कमकुवत झालेल्या 'कलिंगनगरी□ या राजधानीच्या तटबंदी आणि प्रवेशद्वाराची दुरुस्ती केल्याचे नमूद केले आहे. शिशुपालगडच्या उत्खननांमध्येही तटबंदीच्या पश्चिम आणि उत्तर प्रवेशद्वाराची डागडुजी झाल्याचे निष्पन्न झाले आहे. विशेष म्हणजे तटबंदीच्या आत उभे असणारे अठरा स्तंभ आणि उत्खननात प्राप्त लगतचे चापाकार स्थापत्य याच कालखंडातील आहे. अशा प्रकारे 'कलिंगनगरी□ हे स्थळ आजचे शिशुपालगड असल्याचे भक्कम पुरावे प्राप्त झाले आहेत. उत्तर ऐतिहासिक काळामध्ये लोकांनी तटबंदीच्या आत उत्तरेकडे वस्ती केल्याचे पुरावे प्राप्त झाले. प्रथम या काळातील लोकांनी चाक आणि पुष्पाची छाप असलेली मृद्भांडी वापरली व नंतर राखडी रंगाची खोबणीयुक्त नवीन पद्धतीची मृद्भांडी वापरात आणल्याचे प्रमाण प्राप्त झाले. ओडिशाच्या इतर पुरास्थळांमध्ये या राखडी मृद्भांड्यांना मध्ययुगीन कालखंडात समाविष्ट केले जाते. या काळातील स्थापत्य बांधकामाचा कोणताही पुरावा मात्र उत्खननांत आढळला नाही. त्खनन आणि सर्वेक्षणांमुळे शिशुपालगड या सुनियोजितपूर्ण नगराच्या आत प्रवेशद्वारापासून काटकोनात छेद देणाऱ्या रस्त्यांची व्यवस्था, राजवाडा, राजतंत्रीय किंवा प्रशासनिक भवनाचे स्थापत्य, सामान्य लोकांची निवासस्थाने, नाणी आणि इतर महत्त्वपूर्ण पुरावे प्राप्त झाले. उत्खननात प्राप्त एकूण पुरावशेषांच्या आधारावर असे दिसून येते की, प्राचीन शिशुपालगड या नगराचा आवाका मोठा होता व नगरात विपुल लोकसंख्या व आर्थिक स्थैर्य होते. शिशुपालगड हे पूर्व भारतातील महत्त्वाचे राजकीय, आर्थिक, व्यापारी आणि क्षेत्रीय केंद्र म्हणून कार्यरत होते. या उत्खननामुळे शिशुपालगड पासून ९ किमी. अंतरावर असलेल्या अशोकाच्या धौली येथील अभिलेखात नमूद 'तोसली□ हे स्थळ शिशुपालगड असण्याची शक्यता नाकारता येत नाही. इ. स. सहाव्या शतकानंतर येथील वस्तीचे प्रमाण उत्तरोत्तर कमी होत गेले. येथील वस्ती साधारणत: १.५ किमी. पश्चिमेकडे मंदिर परिसरात स्थानांतरित झाल्याने हे पुरास्थळ ओस पडण्यास सुरुवात झाली. सद्यस्थितीत हे पुरास्थळ भुवनेश्वर शहराचा भाग बनलेले असून अतिक्रमणामुळे सदर स्थळ नष्ट होण्याचा मार्गावर आहे.

# ड्रमलिन

हिमनदीने किंवा हिमानी क्रियेने साचलेल्या डबरीद्वारे निर्माण झालेल्या टेकडीसारख्या वैशिष्ट्यपूर्ण भूरूपाला ड्रमलीन म्हणतात. याचा आकार चहाच्या उपड्या चमचासारखा म्हणजे लंबगोलाकार व एक बाजूला निमुळता झालेला असा असतो. हिमनदीने वाहून आणलेल्या रेतीयुक्त गाळाने ड्रमलिन तयार होते. ड्रमलिनाचा मोठा आस हिमनदी ज्या दिशेत वाहते, त्या दिशेत असतो. ड्रमलिनाच्या सुरुवातीच्या बाजूचा उतार काहीसा तीव्र असतो व दुसऱ्या बाजूला तो मंद असतो. सुरुवातीस रुंद असलेले ड्रमलिन पुढील बाजूस सावकाशपणे निमुळते होत गेलेले दिसते. ड्रमलिने सामान्यपणे अंत्य-हिमोढाच्या पाठीमागील बाजूस आढळतात. पर्वतीय भागातील हिमनदी मैदानी भागात उतरून पसरत जाते. त्या ठिकाणी त्यातील हिम साचण्याची जाडी कमी होते आणि हिमनदी वाहण्याची क्षमता वा शक्ती कमी होते. हिमनदीच्या तळालगत असलेला गाळ व जमीन यांत घर्षण होऊन गाळ साचण्यास सुरुवात होते. साचलेले द्रव्य किंवा खळग्यासारखा लहानसा अडथळा अथवा डबरीचे प्रमाण जास्त असलेले हिम यांच्यामुळे ड्रमलिनावर गाळाची गिलाव्यासारखी पुटे एकावर एक अशी साचत जातात. अशा तऱ्हेने ड्रमलिन निर्माण होत जाते. नंतर हिमानी क्रियेद्वारे त्याला आकार प्राप्त होत जातो. लहान ड्रमलिन लहानशा ढिगाएवढे असते. सर्वांत मोठ्या ड्रमलिनांची लांबी २ किमी. वा त्याहून अधिक असू शकते. त्यांची उंची १५ ते ३० मी. किंवा १०० मी. पर्यंत आणि रुंदी ४०० ते ६०० मी. असू शकते. काही ठिकाणी ड्रमलिनांच्या रांगा असतात व त्या एकमेकींना समांतर असतात. सामान्यत: यांचे हजारोंचे समूह आढळतात. पुष्कळदा ते पट्ट्यांच्या स्वरूपात मांडल्यासारखे दिसतात. अशा प्रकारे ड्रमलिन हा हिमानी क्रियेचा उत्तम पुरावा असून त्याच्यावरून हिमनदीच्या प्रवाहाची दिशाही कळते. तसेच हिमनदीची डबर सपाट प्रदेशांत पुष्कळदा ड्रमलिन व एस्कर यांच्या रूपात साचते. बहुतेक ड्रमलिने मृत्तिकामय असून ती धोंडेमातीची म्हणजे हिमनदीखाली साचलेली मृत्तिका, वाळू, रेती, दगडगोटे यांच्या वैचित्र्यपूर्ण मिश्रणाची बनलेली असतात; तथापि काही ड्रमलिने पृष्ठभागी असलेल्या धोंडेमातीखालील खोल खडकांच्या थरांची (खडकाळ ड्रमलिने) बनलेली असतात आणि इतर जवळजवळ घन खडकांची (रोश मूतॉने) असतात. उष्ण, शुष्क प्रदेशांत ड्रमलिने पुष्कळदा गवताने आच्छादिलेली असतात; तर उच्चतर पर्जन्यवृष्टीच्या प्रदेशांत त्यांच्यावर दाट वने व कुरणे असतात. आर्द्र जलवायुमानाच्या (दीर्घकालीन सरासरी हवामानाच्या) प्रदेशांत ड्रमलिनांवर शेतीही करता येते. खडकाचा गाभा व त्यावर साचलेला द्रव्याचा पातळ थर असे ड्रमलिन खरे नसल्याने त्याला भ्रामक ड्रमलिन म्हणतात. ड्रमलिन हा शब्द गेलिक भाषेतील ड्रुइम (druim) या शब्दावरून आला असून त्याचा अर्थ गोलसर टेकडी वा टेकाड असा आहे. तो प्रथम इ. स. १८३३ मध्ये वापरलेला दिसतो. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानातील मध्य विस्कॉन्सिन, मध्य न्यूयॉर्क; वायव्य कॅनडा, नैर्ऋत्य नोव्हास्कोशिया, उत्तर आयर्लंड, स्कॉटलंडची सखल जमीन, उत्तर इंग्लंड येथे शेकड्यांनी ड्रमलिने असून त्यांच्यामुळे पुष्कळदा तथाकथित 'बास्केट ऑफ एग्ज' (अंड्यांची टोपली वा दुरडी) भूमिस्वरूप निर्माण होते. याशिवाय दक्षिण जर्मनी, स्वित्झर्लंड इत्यादी यूरोपीय देशांत, तसेच उत्तर अमेरिकेतील पंचमहासरोवरांच्या आसपासच्या भागांतही ड्रमलिने आढळतात. भारतात काश्मीर, राजस्थान व प. बंगालमध्ये ड्रमलिने आढळली आहेत.

# काँक्रीट

काँक्रीट हे जगातील सर्वाधिक आणि सर्वत्र सामान्यपणे वापरण्यात येणारे बांधकाम साहित्य आहे. सर्वसाधारणपणे काँक्रीट लहान किंवा मोठ्या आकाराचे दगड / खडी, वाळू, सिमेंट आणि पाणी यांच्या मिश्रणापासून तयार केले जाते. या सर्व घटकांना दोन वेगवेगळ्या भागात विभागायचे झाल्यास सिमेंट आणि पाणी यांच्या मिश्रणातून पेस्ट तयार होते, जी वाळू आणि खडी / दगड यांच्या मिश्रणावर आवरण तयार करते. सिमेंट आणि पाणी यांच्या मिश्रणामुळे होणाऱ्या रासायनिक प्रक्रियेस सजलन (Hydration) असे म्हणतात. या प्रक्रियेमुळे सिमेंटची रबडी (Paste) कठिण होते आणि तिच्यामध्ये सामर्थ्य निर्माण होते. या कठिण आणि सामर्थ्यपूर्ण रबडीमध्ये वाळू, दगड आणि खडीसुद्धा एकत्रपणे बांधले जाऊन खडकाच्या सदृश्य काठिण्य असलेले काँक्रीट निर्माण होते. या प्रक्रियेदरम्यान सुरुवातीला ओले असलेले काँक्रीटचे मिश्रण कोणत्याही अपेक्षित आकारामध्ये घडविण्यास सुलभ असते. आणि त्याला कुठल्याही प्रकारचे इष्ट रूप देणे देखील अतिशय सोपे असते. अशाप्रकारे सुरुवातीला हाताळण्यास अतिशय सोपे असलेले परंतु घट्ट झाल्यावर अपेक्षित सामर्थ्य आणि टिकाऊ बांधकाम निर्माण करण्याच्या वैशिष्ट्यामुळे काँक्रीट हे अतिशय लोकप्रिय बांधकाम साहित्य ठरते.



याबरोबरच काँक्रीट तयार करण्यासाठी लागणारे सगळे साहित्य स्थानिकरित्या उपलब्ध असते आणि म्हणूनच कमी खर्चाचे ठरते. दुष्परिणामांपासून इमारतींचे संरक्षण करते. वेगवेगळ्या प्रकारच्या वातावरणात काँक्रीट टिकाऊ ठरते. ऊन, वारा, पाऊस, बर्फ इ. सर्व नैसर्गिक घटकांच्या वरील सर्व वैशिष्ट्यांमुळे इतर सर्व बांधकाम साहित्याच्या तुलनेत जगभरात काँक्रीटच्या बांधकामाला सर्वाधिक पसंती दिली जाते. म्हणूनच जगभरातील लहान मोठ्या घरांच्या इमारती, गगनचुंबी इमारती, विविध आधार – सुविधांच्या संरचना उदा., घरे, इस्पितळे, शाळा, महाविद्यालये, कार्यालये किंवा रस्ते, पूल, रेल्वेस्थानक इ. सर्वच प्रकारच्या बांधकामासाठी खूप मोठ्या प्रमाणावर काँक्रीट वापरले जाते.

# रक्तमोक्षण

एखाद्या रोगाच्या उपचारासाठी शरीरातून त्वचेच्या मार्गाने रक्त बाहेर काढणे म्हणजे रक्तमोक्षण होय. वात, पित्त व कफ हे तीन दोष आवश्यक असलेल्या प्रमाणापेक्षा वाढल्यास काही वेळा ते शरीरातील रक्ताला त्याचे काम नीट करू देत नाही. अशा रक्ताला दूषित रक्त म्हणतात. या दूषित रक्तामुळे शरीरावर फोड येणे, खाज सुटणे असे काही त्वचेचे विकार होतात; तर तोंड येणे, कडू, आंबट घशाशी येणे, योनीवाटे अकारण रक्त जाणे, वातरक्त (सांधेदुखीचा एक प्रकार) असे अनेक रोग होतात. रक्तमोक्षणालाच रक्तविस्त्रावण किंवा शोणित विस्त्रावण असेही म्हणतात. कधीकधी या दूषित रक्ताचा प्रभाव सर्व शरीरभर दिसतो, तर कधी तो एखाद्या भागापुरता मर्यादित असतो. दूषित रक्ताचा प्रभाव कुठवर पसरलेला आहे त्यानुसार रक्तमोक्षणाची पद्धत ठरविली जाते. रक्तमोक्षणाचे मुख्यत: दोन प्रकार पडतात – शस्त्रकृत रक्तमोक्षण : कपिंग थेरपी. (१) शस्त्रकृत रक्तमोक्षण : त्वचेवर एखादी चिर मारून किंवा सुई टोचून रक्त बाहेर काढले जाते, त्याला शस्त्रकृत रक्तमोक्षण असे म्हणतात. याचे दोन प्रकार पडतात – (i) सिरावेध : यात रक्त काढण्यासाठी सुईचा वापर होतो. जर दूषित रक्ताचा प्रभाव सर्व शरीरभर जाणवत असेल, तर त्वचेवरून स्पष्ट





दिसणाऱ्या रक्तवाहिनीत सुई टोचून तिच्याद्वारे रक्त बाहेर काढले जाते. ही पद्धत रक्तदान करतेवेळी अवलंबविण्याच्या ्रक्रियेप्रमाणे आहे. (ii) प्रच्छन : दूषित रक्ताचा प्रभाव एखाद्या भागापुरता मर्यादित असेल, तर प्रच्छन पद्धतीने रक्तमोक्षण केले जाते. यात त्या भागावरील त्वचेवर चिरा मारून आवश्यक तेवढा रक्तस्त्राव होऊ दिला जातो. या ठिकाणी दूषित रक्ताचा प्रभाव त्वचेखाली खूप खोलवर पसरलेला नसेल, तर ही प्रक्रिया लाभदायक ठरते. परंतु, दूषित रक्ताचा प्रभाव थोड्या खोलपर्यंत पसरलेला असेल, तर केवळ वरवर चिरा मारून उपयोग नाही. अशावेळी 'शृंग व अलाबू' या दोन उपकरणांचा वापर केला जातो. अशस्त्रकृत रक्तमोक्षण : जळवांच्या साहाय्याने केले जाणारे रक्तमोक्षण. 'अलाबू' म्हणजेच भोपळा. आतून पोकळ असलेल्या अलाबूत पेटता दिवा ठेऊन तो आतून निर्वात केला जातो व लगेच चिरा दिलेल्या भागावर तो अलाबू दाबून धरला जातो. निर्वात अवस्थेमुळे आत ऋणात्मक दाब तयार होऊन चिरेमधून रक्त बाहेर येऊ लागते. दूषित रक्ताचा प्रभाव त्याहीपेक्षा अधिक खोल असेल तर 'शृंगाचा' वापर होतो. 'शृंग' म्हणजे शिंग. आतून पोकळ, तळाशी पसरट व टोकाशी निमुळते असे विशिष्ट रचना असलेले प्राण्याचे शिंग यात वापरले जाते. शृंगाच्या निमुळत्या टोकाला छिद्र पाडल्यास ते एखाद्या आचुषकाप्रमाणे काम करते. त्वचेवर प्रच्छन करून त्या चिरेवर शृंगाचा तळ दाबून धरून वरच्या टोकाने रक्त शोषल्यास खोलवरचे रक्तही बाहेर येते. सध्या शृंग व अलाबूचा वापर न करता त्याऐवजी प्लॅस्टिकच्या विशिष्ट कपांचा वापर करतात. त्यांच्या साहाय्याने केलेल्या रक्तमोक्षणास 'कपिंग थेरपी' (Cupping therapy) म्हणतात. त्यातही ऋणात्मक दाबाचा उपयोग केला जातो. सुश्रुतसंहितेत विशेषेकरून रक्तमोक्षणासाठी शस्त्रकर्माचा विचार केला आहे. (२) अशस्त्रकृत रक्तमोक्षण : शस्त्राचा वापर न करता केले जाणारे रक्तमोक्षण म्हणजे अशस्त्रकृत रक्तमोक्षण होय. यासाठी बिनविषारी जळवांचा वापर होतो. जळू ही एक रक्त शोषणारी जलचर अळी आहे. काही जळवा विषारी असतात, परंतु त्यांचा रंग बिनविषारी जळवांपेक्षा फार वेगळा असतो. दूषित रक्ताचा प्रभाव एखाद्या भागापुरता मर्यादित असेल, तर जळूचा वापर होतो. जळू त्वचेला चावा घेऊन पकडते व त्या ठिकाणचे दूषित रक्त शोषून घेते. एका मर्यादेपर्यंत रक्त शोषल्यावर जळू चावा सोडते किंवा आवश्यक तेव्हा तिचा चावा सोडविण्यासाठी तिच्या तोंडावर काही औषधी सोडण्यात येतात.

भारत संग्राम (मराठी दैनिक) • RNI No. MAHMAR/2020/79677
मुद्रक - महादा आश्रु हिवाळे प्रकाशक - महादा आश्रु हिवाळे मालक - महादा आश्रु हिवाळे मुद्रण स्थळ - आधार प्रिंटर्स महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशिम ४४४५०५ (महाराष्ट्र) प्रकाशन स्थळ - कार्यालय दैनिक "भारत संग्राम", महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशीम ४४४५०५ (महाराष्ट्र) संपादक – महादा आश्रु हिवाळे (सर्व वाद वाशिम न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

## थोडक्यात



### चांदवड तंत्रनिकेतनमध्ये राज्यस्तरीय 'टेक्नो स्पार्क स्पर्धा

भारत संग्राम | प्रतिनिधी

**चांदवड :** विद्यार्थ्यांच्या अंगभूत कौशल्यांना वाव देण्यासाठी श्री नेमिनाथ जैन ब्रह्मचर्याश्रम संचालित श्री हिरालाल हस्तीमल तंत्रनिकेतन अंतर्गत 'टेक्नो स्पार्क-२०२५' या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जिल्ह्यातील बहुतांश तंत्रनिकेतनमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. विशाल वानखेडे, नाशिकच्या टेक्नो कॅडचे संचालक डॉ. सतीश मणीयार, इलाइट टेक्नोलॉजीचे विजय शर्मा, चांदवडचे बांधकाम व्यावसायिक संदीप कापसे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. गोबा शिंदे, कुणाल काळे, मनिष नलावडे यांनी विविध स्पर्धांचे नियोजन केले. त्यात कॅडवार, पोस्टर प्रेझेंटेशन, ब्रीज मेनिया, प्रश्नमंजूषा स्पर्धा, प्रोजेक्ट कॉम्पिटिशन, लेथवार, शार्कटँक, गेस द मोव्हिज, रील इट-फील इट अशा विविध ९ स्पर्धा घेण्यात आल्या. सूत्रसंचलन ऋतूजा बच्छाव यांनी केले. प्रास्ताविक कुणाल काळे यांनी केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांत सहभाग घेऊन विजेतेपद मिळवले. विजयी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. बक्षीस वितरण सभारंभाचे सूत्रसंचालन अल्केश अजमेरे यांनी केले. दीपक पवार यांनी आभार मानले. तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. विशाल वानखेडे, मेकॅनिकल विभागप्रमुख डॉ. दिनेश लोहार, सिव्हिल विभागप्रमुख डी. बी. पवार, इलेक्ट्रॉनिक आणि टेलिकॅम्युनिकेशन विभागप्रमुख एन. आर. ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. चांदवड तंत्रनिकेतमध्ये 'टेक्नो स्पार्क-२०२५'मधील विजेत्या स्पर्धकांना पारितोषिक देताना प्राचार्य डॉ. विशाल वानखेडे.



### महिनाभर उपवासामुळे शरीरातील विषारी पदार्थ पडतात बाहेर

भारत संग्राम | प्रतिनिधी

मुस्लीम समुदायासाठी सर्वात पवित्र समजल्या जाणाऱ्या रमजान महिन्याला २ मार्चपासून सुरुवात झाली आहे. या संपूर्ण महिन्यात सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत रोजा (उपवास) पाळला जातो. या महिन्यातील आज दहावा उपवास आहे. ठराविक वयोगटातील व्यक्तींसाठी जास्तीत जास्त महिनाभर उपवास करणे आरोग्यासाठी चांगले असल्याचे मत आहारतज्ज्ञ व डॉक्टरांनी व्यक्त केले आहे. रोजानिमित्त संपूर्ण महिनाभर उपवास पाळला जातो. रोजा इस्लामच्या पाच मूलभूत तत्वांपैकी एक असून सर्व मुस्लिमांनी ती जबाबदारीनं पार पाडणं आवश्यक असल्याचे म्हटले जाते. रमजानमध्ये, नमाज पठण करणारे मुस्लीम सकाळी सूर्योदयापूर्वी जेवण करतात, ज्याला "सेहरी" म्हणतात. तेव्हापासून जोवर रोजा संपत नाही, म्हणजे सूर्यास्तापर्यंत दिवसभर काहीही खात नाहीत. संध्याकाळी जे भोजन करतात, त्याला 'इफ्तार' म्हणतात. पण महिन्याभर उपवासाने रक्तातले साखरेचे प्रमाण कमी होऊन थकवा येतो. डोके गरगरणे, मळमळणे, तोंडाला वास येणे, ही लक्षणे दिसतात. शरीर उपवासांना सरावते, तेव्हा शरीरातल्या चरबीचे ज्वलन होऊन रक्तातल्या साखरेचे प्रमाण वाढते. आहारावर नियंत्रण येत असल्याने महिनाभर उपवास आरोग्यासाठी चांगले आहेत. त्यापेक्षा जास्त काळ उपवास करणे चांगले नाही. रमजान व्यतिरिक्त आठवड्यातून ५ दिवस अन्न घेणे व २ दिवस उपवास करणे आरोग्यासाठी फायदेशीर असते, असे डॉक्टर सांगतात. यांनी करावा उपवास निरोगी लोकांनीच रोजा पाळावा, आजारी व्यक्ती, लहान मुलं, गरोदर महिला, स्तनदा माता, मासिक पाळीच्या काळातून जाणाऱ्या महिला आणि प्रवासी यांना रोजा पाळणे बंधनकारक नाही. काही लोकांना रोजा ठेवण्यात काहीही अडचण येत नाही. तर काहींसाठी हे आव्हानात्मक असते. उपवासानंतर हा आहार घ्यावा ^ उपवासामध्ये शरीरात पाणी कमी प्रमाणात जाते. त्यामुळे पाणी लवकर पिणे आवश्यक आहे. नाहीतर शरीरातली पाण्याची पातळी खालावते. उपवासानंतरच्या जेवणात कार्बोहायड्रेट्स, फॅट्स, प्रोटीन्स, फायबर यांसारखे उर्जा देणारे घटक आवश्यक आहेत. - नम्रता मकासरे-मेढे, आहारतज्ज्ञ उपवासामुळे "टॉक्सिन्स" बाहेर रमजानच्या शेवटच्या महिन्यात शरीर उपवासाला पूर्णतः सरावलेलं असते. आतडं, लिव्हर, किडनी या अवयवांमधून शरीराला नको असलेले विषजन्य पदार्थ शरीरातून बाहेर पडण्याची प्रक्रिया सुरु होते. बुद्धी तल्लख होते, तसेच शरीरात ऊर्जा वाढल्याचा भास होतो.

### 178 कोटींची पाणीपुरवठा योजना, श्रीरामपुरात मिळेल 24 तास पाणी

भारत संग्राम | प्रतिनिधी

श्रीरामपूर नगरपरिषदेने मार्च २०२१ मध्ये १०८ कोटींची पाणीपुरवठा प्रस्तावित केली होती. त्यात वाढ होऊन पाणीपुरवठा योजनेसाठी अमृत योजना-दोनमधून १७८ कोटींच्या योजना मंजूर झाली आहे. प्रशासक तथा प्रांताधिकारी किरण सावंत, तसेच मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठा योजना कात टाकून अत्याधुनिक होणार असल्याने श्रीरामपुरकरांना २४ तास पाणी मिळणार आहे. २०११ च्या जनगणनेनुसार श्रीरामपूर शहराची लोकसंख्या ८९ हजार २८२ असली, तरी आजअखेर ती लाखाच्या घरात पोहोचली आहे. श्रीरामपूर शहरासाठी भंडारदरा धरणातील २५३.४६ दशलक्ष घनफूट पाणी राखीव आहे. प्रति मानसी ७० लिटर याप्रमाणे दररोज १ कोटी ७५ लाख लिटर पाणीपुरवठा केला जातो. सध्या पालिकेकडे ४५० दशलक्ष क्षमतेचा एक मातीचा, तर ३७५ दशलक्ष क्षमतेचा एक आरसीसी, असे दोन साठवण तलाव आहेत. त्यातून ४५ दिवस पाणीपुरवठा केला जाऊ शकतो. १९५६ साली पहिली मौलाना आझाद ९ लाख व १९७६ साली उभारलेली कचेरी रोड १४ लाख लिटर, अशोक थिएटर ९ लाख ७० हजार लिटर, मोरगे वस्ती ५ लाख लिटर, भीमनगर ५ लाख, खिलारी वस्ती ५ लाख, गोंधवणी ५ लाख, संजयनगर ९ लाख ७० हजार, मार्केट यार्ड २० लाख, वॉर्ड नं- २ वैदूवाडा येथे २० लाख लिटर, असे एकूण १० जलकुंभ आहेत.

# धम्मपरिषदामध्ये समाजहिताचे निर्णय घेऊन सामूहिक अंमलबजावणी होणे गरजेचे - प्रा . गजेंद्र गवई

भारत संग्राम | प्रतिनिधी

➔ सचिन खंडारे



**बुलडाणा :** विश्ववंदनीय जगतगुरू तथागत बुध्दाच्या महारिनिर्वाणानंतर चक्रवर्ती सम्राट राजा अशोकाने बुद्धतत्वज्ञान संकलित करण्याच्या दृष्टीने भिक्खू संघाला एकत्र करून अनेक धम्म संगीती, धम्म परिषदाचे आयोजन केले. त्या धम्म परिषदामध्ये मुखोदगत असलेले बुध्दवचने लिपिबद्ध करण्यात येऊन त्यातून त्रिपीटक निर्माण झाले व आज त्याच योगे संपूर्ण विश्वात बुद्ध धम्म संघ अस्तित्व आहे. याच परंपरेनुसार आयोजित करण्यात येणाऱ्या धम्मपरिषदामध्ये आजच्या काळानुरूप समाज हिताचे परिवर्तनीय व क्रांतिकारी निर्णय, ठराव घेऊन त्यास सामूहिक मान्यता देऊन भविष्यात त्या निर्णयाची अंमलबजावणी होणे गरजेचे आहे तरच धम्म परिषदा आयोजनाचे फलित होईल असे मत धम्म प्रचारक प्रा. गजेंद्र गवई यांनी मौ. डोमरूळ ता. जि. बुलडाणा येथे आयोजित धम्मपरिषद पूर्व नियोजन सभेत व्यक्त केले. मौ. डोमरूळ ता जि बुलडाणा येथे संबोधी बुद्ध विहाराच्या सभागृहात परिसरातील १०० गावाच्या प्रतिनिधीक उपासकासाठी धाड परिसरात प्रथमच अखिल भारतीय विशाल धम्म परिषद २०२५ आयोजनासाठी मुख्य संयोजक ॲड. विजय जाधव यांचे संकल्पनेतून पूर्व नियोजन विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. सदर सभेच्या अध्यक्षस्थानी युवराज मोरे होते तर प्रमुख उपस्थिती लॉर्ड बुद्धा टीव्ही चे मुख्य संवाददाता धम्म प्रचारक प्रा. गजेंद्र गवई,प्रा.अशोक खरात, (औरंगाबाद ),प्रा. अनिल मगर, सुधाकर हिवाळे,शेषराव इंगळे (औरंगाबाद ) प्रविण साबळे,राजू वाठोरे, अनिल जाधव तराडखेड, संजय पगारे भोकरदन, शाहीर रामराव खरात,यांची होती. सभेच्या सुरुवातीला सभागृहात असलेल्या महामानवाच्या प्रतिमाचे पूजन करून बुद्ध वंदनेने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. परिचय सत्रानंतर प्रा.अशोक खरात यांनी धम्म परिषद आयोजन, व्यवस्थापन, विविध समित्या कार्यप्रणाली यासह अनेक विषय समस्या या बाबत अनुभवातून मांडणी केली तर प्रमुख मार्गदर्शक लॉर्ड बुद्धा टीव्ही चे मुख्य संवाददाता प्रा. गजेंद्र गवई यांनी धम्म परिषद,संगीती आयोजना मागचा उद्देश्य विषद केला, आजकाल अनेक ठिकाणी धम्म परिषद आयोजित केल्या जातात परंतु फक्त महोत्सव म्हणून साजरे होतात,लाखों रुपये लोकवर्गणी करून फक्त मनोरंजन व मोठमोठे भोजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात ज्यामुळे समाजाचा पैसा, वेळ, श्रम खर्च होतो त्यातून समाज हिताचे भविष्यात धम्म संस्कृती रुजवणारे कार्य निष्पन्न होत नाहीत म्हणून धम्म परिषदामध्ये समाजातील असणाऱ्या पोटजाती नष्ट करने, रक्त संबंध प्रस्थापित व्हावे यासाठी पोटजातीत विवाह जुळविणे, तरुणाई ची बेरोजगारी दूर करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करने, अभ्यासिका, ग्रंथालय सुरु करून वाचन संस्कृती रुजविणे, प्रत्येक गावातील समाजातील संपूर्ण माहिती डाटा संकलित करून कायम बुद्ध विहारात ठेवणे, दर रविवारी न चुकता परिवारातील सर्व सदस्यांनी बुद्ध विहारात जाणे यासारखे निर्णय ठराव घेऊन भविष्यात त्याची काटेकोर पणे अंमलबजावणी करने गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. याप्रसंगी नियोजित धम्म परिषदेचे मुख्य संयोजक ॲड. विजय जाधव यांनी धम्म परिषद आयोजन उद्देश, नियोजन, संकल्पना, परिसरातील १०० गावातील बुद्ध विहारे जागृत करणे, प्रत्येक गावातील बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध करून देणे, महिला मुलींना व्यवसायिक प्रशिक्षण देणे, सहकारी संस्था निर्माण करने, आयोजना मागील उद्देश, संभाव्य खर्च, व्यवस्थापन, निधी उभारणी या बाबत विचार व्यक्त केले. यावर साधक बाधक चर्चा करून सर्वानुमते येत्या १८ मे २०२५ ला डोमरूळ परिसरात प्रथम विशाल अ. भा. एक दिवशीय धम्म परिषद आयोजित करण्याचे निश्चित करण्यात आले. याप्रसंगी डोमरूळ येथील संयोजन समितीचे सिद्धार्थ जाधव, रवी जाधव,दातात्रय जाधव, दादाराव जाधव, सागर जाधव, दिनकर जाधव यांचे सह अविनाश खरात (मेंधळा), विजय सपकाळ मसरूळ,संतोष जाधव अशोक जाधव मढ, युवराज मोरे गुम्मी,ज्योतीराव जाधव चौथा, कौतिकराव पारधे,दहिद खुर्द, राजू जाधव तराडखेड, वंदना हिवाळे सातगाव म्हसला , सूर्यदेव काकडे गुम्मी, दादाराव जाधव डोमरूळ, प्रा.अनिल मगर पिंपळगाव रे, चंद्रकांत साळवे चांडोळ,यांची विशेष उपस्थिती होती. सर्वांनी आपापले मनोगत व्यक्त करून सुचना, हरकती विचारात घेऊन धम्म परिषद यशस्वी करण्याचे व त्यासाठी सर्व प्रकारे प्रयन्त करण्याचा सम्यक संकल्प करण्यात आला . सदर धम्म परिषद पूर्व नियोजन सभेसाठी शेकडो महिला पुरुष उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन व आभार प्रा.अशोक खरात यांनी केले.

## मध्यरात्री समृद्धी महामार्गावर वाहनातून उतरणे मजुराच्या अंगलट आले

भारत संग्राम | प्रतिनिधी

➔ सचिन खंडारे



**बुलढाणा :** समृद्धी महामार्ग हा मृत्यूचा महामार्ग बनला की काय अशी शंका येत आहे रोज समृद्धी महामार्गावर अपघात घडत आहे ,9 मार्च रोजी मध्यरात्री 12.30 वाजे दरम्यान चॅनेल क्रमांक 336.5 वर केवळ गाडी मधून लघुशंके करता उतरलेल्या मजुराला आपला पाय गमवावा लागला आहे ' सविस्तर वृत्तांत असा की समृद्धी महामार्गावर टाटा ट्रक ' क्रमांक एम एच 20 जी झेड 2830 हा मध्यरात्री उभा होता ' काही मजुरांना लघु शंका आल्यामुळे मजूर वाहनातून उतरू लागले , तोच अचानक मागील बाजूने भरधाव वेगाने आलेल्या ट्रक एम . एच . 15 एफ व्ही ओ झिरो 0937 उभ्या असलेल्या टाटा ट्रक गाडीला धडकला ' टाटा ट्रक गाडीमध्ये एकूण 11 मजूर होते , मजुरापैकी शोएब शाह वय ३० वर्ष राहणार छत्रपती संभाजी नगर हा गंभीर जखमी झाला असून त्याचा पाय पूर्णपणे फिरलेला आहे 'त्याला समृद्धी महामार्ग रुग्णवाहिका मधून डॉक्टर यासीन शहा ' व चालक प्रवीण राठोड यांनी त्वरित उपचार करता दवाखान्यात नेले 'अपघाताची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक उज्जैनकर तसेच रात्रीची पेट्रोलिंग करीत असलेले पोलीस कर्मचारी यांनी अपघातग्रस्तांना तातडीने मदत केली.

## कधी करणार महायुतीतील तिन्ही पक्ष !

### शेतकऱ्यांना निवडणुकीपूर्वी दिलेल्या सरसकट कर्जमाफीच्या वचनाची पूर्तता कधी?

भारत संग्राम | प्रतिनिधी

➔ प्रदीप सावले




**मालेगाव :** मुख्यमंत्र्यांनी निवडणुकीदरम्यान दिलेल्या शेतीच्या सरसकट कर्जमाफीच्या वचनाची पूर्तता अर्थसंकल्प २०२५ मध्ये नसली, तरी किमान मार्च अखेरपर्यंत तरी ती पूर्ण करावी आणि कर्जबाजारी शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी ठाम मागणी तालुक्यातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे महायुती सरकारने "लाडकी बहिण" योजनेसाठी आधार कार्डचा आधार घेतला, पण शेतकऱ्यांसाठी दिलेले आश्वासनही खरे ठरणार का? याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे शासनाने पुढील आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात शेतकरी कर्जमाफीबाबत कोणतीही ठोस घोषणा न केल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षांना तडा गेला आहे मात्र, राज्य विधीमंडळाच्या चालू अधिवेशनात कर्जमाफीची घोषणा होईल अशी आशा शेतकऱ्यांना अजूनही आहे सध्या शेतीसाठी लागणारे खते, कीटकनाशके, अवजारे, इंधन, मजुरी यांच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत यामुळे उत्पादन खर्च वाढत असताना शेतमालाला योग्य दर मिळत नाही, परिणामी शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अधिकच बिघडली आहे शेतीचा खर्च वाढला, उत्पन्न घटले – शेतकऱ्यांची कोंडी गेल्या काही वर्षांत हवामान बदल, अनियमित पाऊस, गारपीट यामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे त्यातच आधुनिक व भांडवली शेतीच्या नादात शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर खर्च केला, मात्र उत्पादन खर्च आणि उत्पन्न यामध्ये ताळमेळ न बसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे याशिवाय, शेतीसाठी लागणाऱ्या साहित्यावरील जीएसटीसारख्या करांचा बोजा वाढल्याने शेतकरी अधिकच संकटात सापडले आहेत सरकार आश्वासन पूर्ण करणार की फक्त वेळ मारून नेणार? महायुतीतील भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट) आणि अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसने निवडणुकीदरम्यान शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचे मोठे आश्वासन दिले होते मात्र, निवडणुकीनंतर हे आश्वासन पूर्ण करण्याऐवजी सरकार वेळकाढूपणा करणार का? असा प्रश्न शेतकरी वर्गातून विचारला जात आहे सरकारने दिलेला शब्द पूर्ण करून शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा द्यावा, अशी मागणी आता तालुक्यातील शेतकरी संघटनांमधून जोर धरू लागली आहे सरकारने निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने पाळावीत, अन्यथा शेतकरी आक्रमक होण्याची शक्यता आहे आता महायुतीतील तिन्ही पक्ष खरेच बळी राजाला दिलेला शब्द पाळणार का? की काही पळवाट काढून वेळ मारून नेणार? याकडे संपूर्ण शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

## अनुसूचित जाती व नवबौद्ध कुटुंबियासाठी पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण कार्यशाळेचा लोणार येथे शुभारंभ

भारत संग्राम | प्रतिनिधी

➔ सचिन खंडारे



**बुलडाणा :** पंचायत समिती लोणार येथे दिनांक १० मार्च रोजी ' जिल्हा परिषद बुलढाणा पंचायत समिती लोणार व छत्रपती शाहू महाराज बहुउद्देशीय संस्था मलकापूर पांगरा यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष घटक योजना सन २०२३ - २४ अनुसूचित जाती ' नवबौद्ध कुटुंबीयांसाठी पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला पंचायत समिती सभागृहात झालेल्या कार्यक्रमांमध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून गटविकास अधिकारी देशमुख ' पशुधन विकास अधिकारी डॉक्टर रवी मुसळे ' पंचायत समिती लोणार सहाय्यक पशुधन विकास अधिकारी नेवरे पत्रकार सचिन खंडारे पशुधन पर्यवेक्षक वानखेडे ' डॉ वसंता खेडेकर 'मुरडकर ' चौधरी ' व पशुधन विभागातील सर्व कर्मचारी यावेळी उपस्थित होते , सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ मुसळे यांनी केले त्यानंतर डॉक्टर वसंता खेडेकर यांनी सुद्धा पशुधन कार्यशाळेमध्ये सविस्तर माहिती सांगितली, सदर प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षणार्थी यांना वही पेन पुस्तक देण्यात आले. शिवाय प्रशिक्षण संपल्यानंतर स्वादिष्ट जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती ', सदर प्रशिक्षण दिनांक १० मार्च ते १३ मार्च पर्यंत असणार आहे ज्यांनी प्रशिक्षणाचा कालावधी पूर्ण केला त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे ', कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर गंगाराम उबाळे यांनी केले ' तर आभारप्रदर्शन वसंता खेडेकर यांनी केले सदर प्रशिक्षणासाठी अनेक पशुपालक व्यावसायिक उपस्थित होते '

## शिक्षिका स्नेहल सरकटे यांचा लोकमत सखी मंच तर्फे महिला दिनानिमित्त विशेष सन्मान !

भारत संग्राम | प्रतिनिधी

➔ सचिन खंडारे



**बुलढाणा :** मोताळा येथे जिल्हा परिषद शाळा क्रमांक १ येथे आदर्श शिक्षका म्हणून कार्यरत असलेल्या स्नेहल सिद्धार्थ सरकटे यांचा त्यांच्या कार्याबद्दल लोकमत सखी मंचाच्या वतीने महिला दिनानिमित्त विशेष सन्मान करण्यात आला आहे ' स्नेहल सरकटे या सातत्याने जिल्हा परिषद शाळा येथे विद्यार्थ्यांना शिकवताना विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असतात ' त्यामध्ये विद्यार्थ्यांचा वाढदिवस साजरा करणे ' विविध महापुरुषांच्या जयंती पुण्यतिथी साजरी करणे ' विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व कळावे व विद्यार्थ्यांना शिक्षणाचे आकर्षण व्हावे याकरता गाण्याच्या माध्यमातून शिकवणे ,असे विविध उपक्रम त्या राबवत असतात ' याच कार्यामुळे त्यांना 30 डिसेंबर रोजी साखरखेर्डा येथे दिग्गज मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले नारीशक्ती आदर्श शिक्षिका हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले होते ' त्यानंतर अतिशय प्रेरणादायी मुलाखत बुलढाणा चौफेर न्युजच्या वतीने घेण्यात आली होती त्यामध्ये सुद्धा सरकटे मॅडम यांनी अतिशय सुंदर मुलाखत दिली होती आणि याच कार्याची दखल घेत त्यांचा सन्मान लोकमत सखी मंचातर्फे करण्यात आला , त्यांना सन्मानपत्र देताना सन्मानपत्र वर त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून स्वप्नांना पंख मिळू दे ,पाऊल सतत पुढेच पडू दे , अशी शब्द आहेत हे शब्द प्रेरणादायी असून लोकमतच्या वरिष्ठ व प्रतिष्ठित मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये त्यांचा हा सन्मान करण्यात आला, नक्कीच त्यांच्या कार्याला बळ मिळेल हा सन्मान तर सर्व महिलांसाठी प्रेरणादायी आहे की त्या समाजात चांगले काम करतात .त्यांना मिळालेल्या सन्मानामुळे त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे .

# अजीम नवाज राही यांची वक्तृत्वयात्रा साधनेतून सधन झाली -डॉ किरण अष्टपुत्रे

भारत संग्राम | प्रतिनिधी

➔ सचिन खंडारे



**बुलडाणा :** अजीम नवाज राही महाराष्ट्र राज्याच्या लेखणी आणि वाणी या दोन क्षेत्रातील प्रतिभाशाली आणि वलयांकित नाव. एखाद्याला बोलता येतं तर लिहिता येत नाही; लिहिता येते तर बोलता येत नाही.लेखणी आणि वाणी या दोन गडांवर अजीम नवाज राही यांच्या प्रतिभेचा झेंडा आज दिमाखदारपणे फडकत आहे. वक्तृत्व आणि सूत्रसंचालनाच्या क्षेत्रात अजीम नवाज राही यांच्या श्रवणीय मुशाफिरीला आज 43 वर्ष पूर्ण होत आहेत, साधनेतून सधन झालेली अजीम नवाज राही यांची वक्तृत्वयात्रा ,निवेदनयात्रा आम्हा मराठी भाषिकांसाठी सदैव अभिमानास्पद आहे असे प्रतिपादन डॉ किरण अष्टपुत्रे यांनी केले

9 मार्च रोजी जालना शहराच्या हॉटेल शौर्यच्या सुसज्जीत, वातानुकूलित सभागृहात महिको या नामांकित कंपनीतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचारी यांच्या स्नेहमेळाव्याचे भव्यदिव्य आयोजन करण्यात आले होते,स्नेहमेळाव्याच्या अध्यक्षस्थानी डॉ एम के शर्मा होते,प्रमुख अतिथी म्हणून एकनाथराव खरडे, डॉ प्रभू, माणिकराव बदकुले, सतिषचंद्र सावे,नारायण भारतीया, दुधानी साहेब,शंकर भारतीया आणि गोरक्ष थोरात ही महिकोची सेवानिवृत्त अधिकारी मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती,स्नेहमेळाव्याच्या द्वितीयसत्रात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या भूषणावह निमित्ताने शाल,श्रीफळ, पुष्पगुच्छ, मानपत्र,स्मृतिचिन्ह आणि पंधरा हजार रुपये सन्मानराशी देऊन वक्तृत्वाच्या, निवेदनाच्या क्षेत्रात 43 वर्ष श्रवणीय मुशाफिरी झाल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे प्रख्यात मराठी कवी,नामवंत वक्ते,निवेदक अजीम नवाज राही यांचा जिव्हाळ्याचा सत्कार आयोजन समितीचे सूत्रधार डॉ किरण अष्टपुत्रे, राम अंबुरे,शंकर भारतीया,आर आर कुलकर्णी, राऊत साहेब, बाले साहेब, औधेकर साहेब, चौधरी साहेब, गोरटे साहेब यांनी सत्कार केला अजीम नवाज राही यांचा परिचय देतांना डॉ किरण अष्टपुत्रे म्हणाले की, एका प्रतिभावंताला भाषेवर जगता येते हे अजीम नवाज राही यांच्या वक्तृत्वयात्रेने केव्हाचे सिद्ध केले आहे, राज्यभर आयोजित होणाऱ्या विविध सोहळ्याचे निमित्ताने वर्षभर व्यस्त राहणारा एक वक्ता आणि निवेदक म्हणून अजीम नवाज राही यांची ख्याती सर्वश्रुत आहे, रोजगाराच्या सगळ्या शक्यता जेव्हा मावळल्या तेंव्हा भाषा आणि वाणी त्यांच्या दिमतीला आली, त्यांच्या रसाळ,मधाळ, श्रवणीय वाणीला रसिकाश्रय मिळालं, एकीकडे वाणी आणि दुसरीकडे वस्तुनिष्ठ,सकस लेखणी आता अथर्व पब्लिकेशन्स जळगाव तर्फे प्रकाशित होणारा त्यांचा पाचवा कवितासंग्रह त्याचं नाव वळीवावाचा वेळा, वळीवाच्या वेळा जिवनजाणिवांचा मेळा आहे,इयत्ता 10 वी 11 वी च्या पाठयपुस्तकांनंतर व्यवहाराचा काळा घोडा,कल्लोळातला एकांत, वर्तमानाचा वतनदार आणि तळमळीचा तळ या चार गाजलेल्या कवितासंग्रहांचा महाराष्ट्र राज्याच्या 11 विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश आहे,

## थोडक्यात



### बलात्कार करणाऱ्या नराधमांना नपुंसक करा:राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची मागणी; छेड काढणाऱ्यांना चोप देण्याचाही सल्ला

भारत संग्राम । प्रतिनिधी

**मुंबई ;** महिलांच्याबाबतीत घडणाऱ्या अशा घटना कमी करायच्या असतील तर मनातच भीती निर्माण करायला हवी. यासाठी महिलांची छेड काढणाऱ्यांना थेट चोप आणि बलात्कार करणाऱ्या नराधमांना नपुंसक केलं पाहिजे, असे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी म्हटले आहे. राज्यात महिला अत्याचाराच्या घटना चिंतेचा विषय बनल्या आहेत, याप्रकरणी राज्यपाल बागडे यांनी हे वक्तव्य केले आहे. राज्यपाल हरिभाऊ बागडे म्हणाले की, महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य होते, तेव्हा गावचा एका पाटील होता. त्याने एका तरूणीवर बलात्कार केला. ते दुष्कृत्य समोर येताच शिवाजी महाराजांनी थेट आदेश दिला. अत्याचार करणाऱ्याला जीवे मारू नका, त्याचे हात-पाय तिथल्या तिथे तोडा, असे शिवाजी महाराजांनी सांगितले होते. मरेपर्यंत तो (पाटील) तशाच अवस्थेत राहिला. सोमवारी बलात्काराच्या वाढत्या घटनांबाबत बोलताना भरतपूर जिल्हा बार असोसिएशनच्या शपथविधी समारंभात व्यासपीठावरून राज्यपालांनी हे वक्तव्य केले आहे हरिभाऊ बागडे म्हणाले की, काही लोक महिलांवर अत्याचार होत असतानाही व्हिडिओ बनवत असतात. जे योग्य नाही. आपल्या समोर अशी घटना होत असले तर त्याला पकडा. एकटे आहात म्हणून मागे हटू नका. समोर या आणखी 2-4 लोक मदतीला येतील. जोपर्यंत विनयभंग करणाऱ्याला आपण चोप देत नाही तोपर्यंत अशा गुन्ह्यांना आळा बसणार नाही. हरिभाऊ बागडे म्हणाले की, नराधमांमध्ये धाक निर्माण करायचा असेल तर कायद्याच्या भीतीसाठी काय करावे, याचा आता तुम्हीच विचार करा. गुन्हेगारांना कायद्याचा धाक नसल्याचे अशा घटना घडत आहेत. सध्या आपल्या देशात 12 वर्षांखालील मुलीवर लैंगिक अत्याचार किंवा विनयभंग केला तर फाशीची तरतूद आहे. पण तरीही अशा घटना थांबत नाहीत.

### अर्थसंकल्पात ना आश्वासनांचे भान, ना वचनांची जाण:फक्त बडबडे आणि त्यांनी सोडलेले पोकळ संकल्पांचे बुडबुडे! उद्धव ठाकरे गटाची टीका

भारत संग्राम । प्रतिनिधी

विद्यमान सरकारचा पहिलाच अर्थसंकल्प असल्याने आधी दिलेली आश्वासने आणि पाच वर्षांत करायची नवी कामे याची नोंद त्यात दिसेल, अशी जनतेची भाबडी अपेक्षा होती. मात्र राज्यकर्त्यांनी पहिल्याच अर्थसंकल्पात त्यांच्या 'गरज सरो वैद्य मरो' या मानसिकतेचे दर्शन घडविले. राज्यातील जनतेच्या पदरात तर काही टाकले नाहीच, परंतु शेतकरी आणि लाडक्या बहिणींच्याही तोंडाला पाने पुसण्याचा कृतघ्नपणा केला. अर्थमंत्र्यांनी त्यांच्या भाषणात "का आम्हाला सत्ता मिळाली याची जाण आहे... काय करायचे याचे भान आहे," असे काव्यपंक्तीचे फुगे जरूर उडविले, परंतु अर्थसंकल्पात ना दिलेल्या आश्वासनांचे भान दिसले, ना वचनांची जाण. दिसले ते फक्त बडबडे आणि त्यांनी सोडलेले पोकळ संकल्पांचे बुडबुडे! अशा शब्दात उद्धव ठाकरे गटाने अजित पवारांच्या अर्थसंकल्पावर दैनिक सामनाच्या माध्यमातून निशाणा साधला आहे. गेल्या वर्षी विधानसभा निवडणूक तोंडावर असल्याने सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी अर्थसंकल्पात हात एकदम सैल सोडला होता. त्या सैल हातांच्या ओंजळीत भरभरून मते मिळाली. त्यांचा कार्यभाग साध्य झाला आणि मग सत्तेत बसल्यानंतरच्या पहिल्यावहिल्या अर्थसंकल्पात या मंडळींनी हातच वर केले. कोणाच्या पदरात काहीच टाकले नाही. हे अपेक्षितच होते. पहिल्याच अर्थसंकल्पात आपला खरा चेहरा दाखवला. अर्थमंत्री अजित पवार यांनी म्हणे सोमवारी अकरावा अर्थसंकल्प मांडला. हा एक विक्रम वगैरे आहे. असेलही, पण त्यांच्या या विक्रमाचा अभिमान महाराष्ट्राने बाळगावा, असे त्यांनी महाराष्ट्राला या अर्थसंकल्पात काय दिले? काहीच नाही. अकराव्या अर्थसंकल्पातही अजित पवारांनी कोटीच्या कोटी उड्डाणे केली. घोषणा आणि योजनांचा पाऊस पाडला. पुढील पाच वर्षांत महाराष्ट्र कसा प्रगतिपथावर जाईल याचे 'गुलाबी' स्वप्न गुलाबी जॅकेट न घालता जनतेला दाखविले. त्यासाठी अधूनमधून कवितांच्या ओळींचाही आधार घेतला. मात्र ही स्वप्ने पूर्ण होण्यासाठी जो 'अर्थ' आणि 'संकल्पां'चा मेळ लागतो तो अर्थसंकल्पात होता कुठे? अर्थमंत्र्यांनी भाषणात कोटय़वधींच्या तरतुदींची साखरपेरणी केली खरी, परंतु हा पैसा सरकारकडे प्रत्यक्षात आहे का? असेल तर किती आहे? नसेल तर सरकार तो कसा उभा करणार आहे? तब्बल 45 हजार कोटींची तूट सरकार कशी भरून काढणार? शेती वगळता उद्योग आणि सेवा या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राची जी प्रचंड पीछेहाट झाली आहे, ती भरून अशी काढणार? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अर्थमंत्र्यांकडून अपेक्षित होती. मात्र अर्थमंत्र्यांनी ना ती जबाबदारी स्वीकारली, ना उपाययोजना सांगितल्या. नुसत्याच घोषणा, योजना आणि तरतुदी हा नेहमीचा बनवाबनवीचा खेळ ते खेळले. अर्थात आडातच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार? राज्यातील सात ठिकाणी आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्रे, महाराष्ट्र टेक्निकल टेक्स्टाईल मिशन, उद्योजकांना परवानग्यांसाठी 'मैत्री' हे वेब पोर्टल, नवी मुंबईत नावीन्यता नगर इनोव्हेशन सेंटर, मुंबई गतिमान करण्यासाठी 64 हजार 787 कोटींचे प्रकल्प, मुंबईसह नवी मुंबई, ठाणे, पुणे येथील मेट्रोचे प्रकल्प, 3 ऑक्टोबर हा 'मराठी सन्मान दिवस' म्हणून साजरा करणे, अशा अनेक घोषणा अर्थमंत्र्यांनी केल्या. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक आग्रा येथे आणि स्वराज्यासाठी बलिदान दिलेल्या छत्रपती संभाजी महाराजांचे भव्य स्मारक कोकणातील संगमेश्वर येथे उभारण्याची घोषणा त्यांनी केली. पानिपत येथे मराठ्यांच्या शौर्याचे प्रतीक म्हणून स्मारक उभारले जाईल, असेही ते म्हणाले. महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या जाज्वल्य इतिहासाचा मानबिंदू असलेली ही स्मारके उभारलीच पाहिजेत, परंतु त्याच वेळी जरा तुम्हीच जाहीर केलेल्या, पण तुमच्याच विस्मरणात गेलेल्या अरबी समुद्रातील भव्य शिवस्मारकाचेही जरा पहा! अर्थमंत्र्यांना असेच विस्मरण शेतकरी आणि त्यांच्या लाडक्या बहिणींचेही झाले. शेतकरी हा आपला पोशिंदा असे ते जरूर म्हणाले, परंतु कृषी क्षेत्रासाठी नेहमीच्या योजना आणि त्यासाठी 9 हजार 710 कोटींची तरतूद यापलीकडे बळीराजाच्या ओंजळीत त्यांनी काहीच टाकले नाही. दिवसा वीज देऊ आणि पुढील पाच वर्षांत विजेचे दर स्वस्त करू असे गाजर त्यांनी दाखवले. कृषी क्षेत्रात 'एआय' वापरासाठी धोरण आखण्यात येईल, असेही त्यांनी जाहीर केले.

# मराठा सेवा संघाच्या तालुका अध्यक्षपदी तेजराव जाधव तर सचिवपदी अशोकराव जाधव

भारत संग्राम । प्रतिनिधी
प्रदीप सावले



**मालेगाव :** मराठा सेवा संघ तालुका मालेगाव ची नूतन कार्यकारणी ९ मार्च रोजी निवडण्यात आली असून तालुका अध्यक्षपदी शिवश्री तेजराव पाटील जाधव यांची तर सचिव पदी शिवश्री अशोकराव व्यंकटी जाधव यांची निवड करण्यात आली या सभेच्या अध्यक्ष स्थानी माजी जिल्हाध्यक्ष तथा प्रबोधन कक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा.भरत आव्हाळे हे होते मराठा सेवा संघाच्या मालेगांव तालुका कार्यकारिणीची तीन वर्षाची मुदत संपल्यामुळे यापूर्वीचे तालुकाध्यक्ष अनिल गवळी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष तथा राज्य कार्यकारिणी सदस्य मा.प्राचार्य वसंतराव अवचार तसेच समाज प्रबोधक गोपाल पाटील राऊत,मराठा सेवा संघाचे विभागीय सचिव प्रा. अनंतराव गायकवाड,बबनराव जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम जिजाऊ पुजन व जिजाऊ वंदना घेण्यात आली त्यानंतर सर्वांनुमते निवडण्यात आलेल्या तालुका कार्यकारणी मध्ये अध्यक्षपदी तेजराव पाटील जाधव,कार्याध्यक्षपदी प्रदीप पाटील नागे व सचिव पदी अशोकराव जाधव यांची तर उपाध्यक्षपदी डॉ अनिल प्रकाश लहाने,गजानन प्रकाश केळे,अरूण प्रल्हाद कढणे यांची निवड करण्यात आली. तसेच सहसचिव पदावर शालिक अर्जुनराव चव्हाण व परसराम बोरकर,कोषाध्यक्षपदी शरद अभिमान सुर्वे,संघटक पदी पंजाबराव वरकड,दिनकरराव पोकळे,डॉ पंकज बोरकर यांची निवड करण्यात आली प्रसिद्धी प्रमुख पदी प्रा.रवी वानखेडे व भागवत मापारी यांची निवड करण्यात आली. तसेच प्रवक्ते म्हणून प्रशांत वाझुळकर,साहेबराव कढणे,श्रीराम अवचार तसेच व मार्गदर्शक म्हणून शेषराव जाधव,दत्तराव पोफळे,अनिल गवळी,मनोज वाझुळकर,जगन्नाथ रंजवे,बबनराव जाधव तसेच सल्लागारपदी ॲड शंकरराव मगर,बबनराव सोनाळकर,विश्वनाथ शिंदे,गणेश कुटे यांची सर्वांमध्ये निवड करण्यात आली तसेच सदस्य पदी गोपाल कुटे,राजुभाऊ ठाकरे,जगन्नाथ भालेराव,विठ्ठल कुटे,सतीष कुटे,विजय देवळे,विनोद गवळी,मा.मुख्याध्यापक आत्माराम पडघान,डॉक्टर मदन कुटे,ॲड.सतीश मगर,अशोकराव अवचार,डिगांबर सोमटकर,दिलीप देवकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली यावेळी गोपाल पाटील राऊत,वसंतराव अवचार विचार व्यक्त केले तर प्रा भरत आव्हाळे यांनी अध्यक्षीय भाषण केले प्रास्ताविक प्रा अनंत गायकवाड,संचालन तेजराव जाधव यांनी केले आभार प्रशांत वाझुळकर यांनी मानले सभेला कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती,

## गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांनी पालकाची भूमिका वटवावी-गटशिक्षणाधिकारी वाघमारे

भारत संग्राम । प्रतिनिधी
सचिन खंडारे



**बुलडाणा :** गुणवत्ता वाढीसाठी शिक्षकांनी पालकांची भूमिका वटवावी असे मनोगत सहकार विद्या मंदिर सिंदखेड राजा येथे दिनांक 7 मार्च रोजी शिक्षक क्षमतावृद्धी प्रशिक्षण समारोप प्रसंगी गटशिक्षणाधिकारी भास्करराव वाघमारे आपले मनोगत वक्त करताना बोलत होते. सहकार विद्या मंदिर सिंदखेड राजा येथे प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांचे पाच दिवशीय प्रशिक्षण संपन्न झाले प्रशिक्षणास 7 प्राथमिक व 9 माध्यमिक शिक्षकांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणून यांनी कार्य केले. दिनांक 7 मार्च रोजी प्रशिक्षणचा समारोप करण्यात आला.शिक्षक प्रशिक्षणात मिळालेल्या माहितीचा शाळास्तरावर विद्यार्थी विकासासाठी उपयोग करावा करावा तसेच प्रशिक्षणाचा लाभ आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना व्हावा या दृष्टीने शिक्षकाने प्रयत्न करावे तसेच शाळेच्या समग्र विकास साधण्यासाठी नेहमी वेगवेगळे उपक्रम राबवावे असे यावेळी गटशिक्षणाधिकारी यांनी सांगितले गुणवत्तेचा विकास करायचा असेल तर त्यासाठी शालेय वेळी शिक्षकांनी शिक्षकांच्या भूमिके सोबतच पालकाची भूमिका सुद्धा पार पाडल्यास गुणवत्ता वाढल्याशिवाय राहणार नाही तरी सर्व शिक्षक बांधवांनी शालेय वेळी शिक्षकांच्या भूमिकेबरोबरच पालकाची भूमिका सुद्धा वटवावी असे आव्हान त्यांनी यावेळी केले त्यामुळे शालेय गुणवत्ता निश्चितच वाढल्याशिवाय राहणार नाही असे बोलताना भास्करराव वाघमारे गटशिक्षणाधिकारी यांनी सांगितले.समारोप प्रसंगी प्रशिक्षणार्थींनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी तज्ञ शिक्षक यांना जिल्हास्तरीय प्रमाणपत्राचे वाटप करण्यातआले प्रशिक्षणा दरम्यान विनोद कंकाळ यांनी प्रशिक्षण समन्वयक व प्रवीण गवई पद्माकर गवई विषय साधनव्यक्ती, प्रविण मिरटकर कु स्वरूपा बोने विशेषतज्ञ यांनी प्रशिक्षण प्रमुख म्हणून कामकाज पाहिले .समारोप प्रसंगी संतोष सोनुने गट समन्वयक तज्ञ मार्गदर्शक उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन .गिते सर व आभार प्रदर्शन घेवंदे सर यांनी मानले.

## सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिमेला सुरुवात

### जास्तीत जास्त संशयित रुग्ण शोधा - डॉक्टर महेंद्रकुमार साळवे

भारत संग्राम । प्रतिनिधी
सचिन खंडारे



**बुलडाणा :** दिनांक 10 मार्च रोजी ग्रामीण रुग्णालय सिंदखेडराजा येथे राष्ट्रीय क्षयरोग द्रूीकरण कार्यक्रमांतर्गत सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहीमेची सुरुवात करण्यात आली ही मोहीम 10 मार्च 2025 ते 22 मार्च 2025 पर्यंत राहील यामध्ये आज तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय व ग्रामीण रुग्णालय सिंदखेडराजा येथील कर्मचारी व तसेच अधिकारी यांच्या उपस्थित या मोहिमेला सुरुवात करण्यात आली यावेळी ,ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर नितीन जाधव सर , तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर महेंद्रकुमार साळवे सर, डॉ.गाणार,वैद्यकिय अधिकारी डॉ.चाटे सर हे उपस्थित होते यावेळी आरोग्य कर्मचारी आरोग्य सेवक लक्ष्मणराव राठोड,आरोग्य सहाय्यक दादाराव खरात ,संतोष खरात, पर्यवेक्षक नितीन इंगळे, डॉ.शेख , संदीप खरात ,आरोग्य सेवक आरोग्य सेविका उपस्थित होते संतोषकुमार देशमुख,अंबादास डुक्करे ,सुनील सुरोशे ,औषध निर्माण अधिकारी नाना महेत्रे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ नारायण सुरोशे ,नितीन गवई,आतिश जाधव ,परमेश्वर पराड,प्रवीण शिंदे,कविता शिंगणे 10 दहा दिवस चालणाऱ्याया TB रुग्ण शोध मोहिमेत जास्तीत जास्त संशयित रुग्ण शोधावे तसे त्यांना उपचार सुरु करावे असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ.महेंद्रकुमार साळवे सर यांनी केले तसेच सर्व्हे साठी येणाऱ्या कर्मचारी यांना लोकांना सहकार्य करावे असे यावेळी त्यांनी सांगितले .

## स्त्रियांनी शिक्षणाच्या माध्यमातून आपले अस्तित्व निर्माण करावे



भारत संग्राम । प्रतिनिधी

**कळवण :** स्त्री ही कुटुंबाचा पाया आहे. आणि तिच्याभोवती संपूर्ण कुटुंब फिरत असते त्यामुळे तिचा सन्मान हा झालाच पाहिजे. मात्र तो सन्मान फक्त महिला दिनापुरता न राहता नेहमीसाठी असावा. त्यासाठी स्त्रियांना कायद्याने अनेक अधिकार दिले असून समाजात कुठेही न डगमगता शिक्षणाच्या जोरावर महिलांनी आपले अस्तित्व सक्षमपणे निर्माण करण्याचा सल्ला डॉ. शैलेजा पगार यांनी दिला.

येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात महिला कक्षा अंतर्गत जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रमुख अतिथी म्हणून नगरसेविका सुनीता पगार, उपनगराध्यक्ष ज्योत्स्ना जाधव, मंगलताई पगार, प्राचार्य डॉ. बी.एस. पगार, उपप्राचार्य एस. एम. पगार आदिंसह महिला कक्ष अधिकारी उपस्थित होते. मंगलताई पगार यांनी महिला दिनानिमित्त सर्व उपस्थित विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एम. व्ही. बोरसे यांनी केले. प्रा. एम. व्ही. घोडके यांनी आभार मानले. यावेळी सर्व महिला प्राध्यापिकांचा सत्कार करण्यात आला.

## पोलीस बॅच २००५ स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

भारत संग्राम । प्रतिनिधी
सचिन खंडारे



**बुलडाणा :** जिल्ह्याचे सुपुत्र पोलीस बॅच नागपूर शहर- 2005 यांना पोलीस सेवेमध्ये 20 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल पंकज लॉन देऊळगाव राजा जिल्हा बुलढाणा येथे स्नेहसंमेलन कार्यक्रम संपन्न झाला. दिनांक 9 मार्च रोजी बुलढाणा जिल्ह्यामधील नागपूर शहर येथे मार्च 2005 साली पोलीस दलामध्ये भरती झालेले पोलीस कर्मचारी यांनी सहपरिवार (गेट-टुगेदर) स्नेहसंमेलन चा कार्यक्रम आयोजित करण्यातआला होता. सदर कार्यक्रमाचे आयोजन देऊळगावराजा पोलीस स्टेशन येथील कार्यरत पोलीस हेडकॉन्स्टेबल माधव कुटे व शिवानंद मुंडे यांनी परिश्रम घेऊन आयोजित केला होता. सर्वप्रथम बुलढाणा जिल्ह्याचे दैवत श्री गजानन महाराज यांच्या प्रतिमेला हार अर्पण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सदर बॅचमधील काही पोलीस कर्मचारी हे अधिकारी पदावर नियुक्ती होऊन कार्यरत आहे.त्यापैकी बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार श्री अमर नागरे API व त्यांच्या सौभाग्यवती मंदाकिनी अमर नागरे यांचा सत्कार ,महामार्ग पोलीस चे पोलीस हेड कॉन्स्टेबल विठ्ठल काळुसे व सौ ज्योती विठ्ठल काळुसे यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला. तसेच सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे हेड मोहरर दीपक नाफडे यांनी केले. सदर कार्यक्रमाकरिता जालना जिल्हा पोलीस दलात , नागपूर शहर येथून बदली झालेले श्री संदीप बोंद्रे ,संतोष वनवे ,शिवहरी डिघोळे, सुभाष डोईफोडे, दीपक घुगे कैलास खार्डे, गजानन काकड राधाकिसन जायभाये, विलास डोईफोडे, तसेच बुलढाणा जिल्हा पोलीस दलामध्ये कार्यरत असलेले संतोष काकड ,शरद मुंडे ,शंकर वाघ, राजेंद्र सानप, अरुण राठोड, संतोष पुंजाजी वनवे, भारत सानप, शिवानंद केदार, अशोक सांगळे, व वाशिम पोलीस दलात कार्यरत असलेले संतोष वाघ कारंजा पोलीस स्टेशन, व मोहन माने इत्यादी पोलीस कर्मचारी व त्यांच्या अर्धांगिनी व मुलं मुली,सर्व 20 वर्षानंतर एकत्र जमून मनमोकळेपणाने हितगुज केली तसेच प्रत्येक पोलीस कर्मचारी व त्यांची पत्नी मुले स्टेजवर येऊन प्रत्येकाने आपले मनोगत व्यक्त केले. तसेच पोलीस पत्नी यांनी आपल्या पती बद्दल पोलीस दलामध्ये वीस वर्षांमध्ये आलेले एकूण अनुभव कथन केले. तसेच संगीत खुर्ची चे आयोजन करण्यात आले व सर्वांनी एकत्रित स्नेहभोजन केले .सर्व कार्यक्रम अत्यंत उत्साहात व आनंदी वातावरणात पार पडला.

# पोलिसांसाठी फरार सतीश भोसलेची वृत्तवाहिनीला मुलाखत

भारत संग्राम । प्रतिनिधी



भारतीय जनता पक्षाचा पदाधिकारी यांनी आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता म्हणून ओळख असलेल्या सतीश भोसले याच्यावर अनेक आरोप होत आहेत. मात्र, तो पोलिसांना सापडलेला नसतानाच एका वृत्तवाहिनीवर त्याने मुलाखत दिली आहे. यादरम्यान त्याने त्याच्यावर होणारे सर्व आरोपी फेटाळले आहे. सर्व प्रकरणातील सत्याचा तपास करा, मी स्वतःला निर्दोष सिद्ध करू शकलो नाही तर स्वतःहून पोलिसांना शरण जाईल, असेही त्याने वृत्त वाहिनीशी बोलताना म्हटले आहे.

बीडच्या शिरुर येथील एका व्यक्तीला बॅटने अमानुष मारहाण केल्याप्रकरणी पोलिसांनी भाजप आमदार सुरेश धस यांचा कार्यकर्ता असलेल्या सतीश भोसलेवर गुन्हा दाखल केला आहे. आधीच बीड जिल्हा सध्या सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळे गाजत आहे. या प्रकरणी धनंजय मुंडे यांना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामाही द्यावा लागला आहे. त्यातच सतीश भोसले याचा एका व्यक्तीला मारहाण करतानाचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी हा व्हिडिओ पोस्ट करत या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजप आमदार सुरेश धस यांच्याकडे स्पष्टीकरण मागितले होते. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी भाजपचा कार्यकर्ता असणाऱ्या सतीश भोसले याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर त्याचे अनेक व्हिडिओ व्हायरल झाले आहेत. आता त्याने स्वत: या सर्व प्रकरणात स्पष्टिकरण दिले आहे. सतीश भोसले याचे अनेक व्हिडिओ समाज माध्यमांवर व्हायला होत आहेत. दरम्यान सतीश भोसले याच्या घरावर देखील वन विभागाने छापा टाकला होता. त्याच्या घरामध्ये प्राण्यांना पकडण्यासाठी तयार करण्यात आलेले अनेक सापळे, धारदार शस्त्रे आणि प्राण्यांचे मांस देखील आढळून आले होते. त्यामुळे सतीश भोसले याच्यावर आता अटकेची टांगती तलवार लटकत आहे. मात्र तो गेल्या अनेक दिवसांपासून फरार आहे. फरार असताना आणि पोलिस त्याचा शोध घेत असताना देखील तो अचानक माध्यमांसमोर हजर झाला. टीव्ही9 या वृत्त वाहिनीला त्याने दिलेल्या विशेष मुलाखतीमध्ये त्याच्यावरील सर्व आरोप फेटाळले आहेत. तसेच त्याच्या वतीने बीड येथील न्यायालयात जामिनासाठी अर्ज करण्यात आला आहे. सतीश भोसले याने एका व्यक्तीला मारहाण करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. याविषयी बोलताना त्याने सांगितले की, माझा मित्र माऊली खेडकर यांच्या पत्नीची सदरील व्यक्ती वारंवार छेड काढत होता. माझ्याकडे तुझा आंघोळ करतानाचा व्हिडिओ आहे, तो मी व्हायरल करेल, अशी धमकी देऊन महिलेकडे विचित्र मागणी करत होता. हे सर्व माझ्या मित्राने मला सांगितल्यावर मला राग आला आणि मी त्याला मारहाण केली. हे या मागचे खरे प्रकरण असल्याचा दावा सतीश भोसले याने केला आहे. यावेळी सतीश भोसले याने अंजली दमानिया या करत असलेल्या आरोपावर देखील स्पष्टीकरण दिले आहे. दमानिया यांना चुकीची माहिती पुरवली जात असल्याचे ते म्हणाले. मला गुंड कशाला म्हणतात? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. माझी सामाजिक क्षेत्रातील कामे पहा. त्या कार्यक्रमातील व्हिडिओ फोटो सोशल मीडियावर आहेत. ती पहा, जे व्हिडिओ व्हायरल होत आहेत ते संपूर्ण व्हिडिओ व्हायरल करा, असे आवाहन देखील त्याने केले. त्या शाळेत जा मुलांची चौकशी करा, असे देखील तो म्हणाला. मी 200 हरणांची शिकार केली, असा आरोप माऊली शिरसाट करत आहे. मात्र त्याने त्या वेळी तक्रार का केली नाही? असा प्रश्न सतीश भोसले यांनी विचारला आहे. 200 हरणे हा काही जोक नाही. तुम्ही आधी त्याची शहानिशा करा, असे आवाहन देखील भोसले याने केले आहे. असले लोक माझ्या विरोधात मोर्चा काढतात आणि आंदोलन करतात, त्यांच्यात किती सत्य आहे, हे देखील तपासा. माऊली शिरसाटला स्वतःला मोठे व्हायचे आहे, असा आरोप भोसले याने केला आहे.




दैनिक                सत्याचा बुलंद आवाज

# भारत संग्राम

## विदर्भात अग्रगण्य अशा दैनिक भारत संग्राम वृत्तपत्रासाठी खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे

**वृतपत्रमध्ये काम केल्याचा अनुभव आवश्यक**

## खालील जिल्ह्यात जिल्हा पातळीवर/तालुका पातळीवर प्रतिनिधी नियुक्त करणे आहे

**अमरावती**
अंजणगाव, सुर्जी, वरुड, तिवसा, मोर्शी, धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे, धारणी, भातकुली, चिखलदरा

**यवतमाळ**
उमरखेड (तालुका) प्रतिनिधी, झरी जामणी, घाटंजी (शहर ) प्रतिनिधी, आर्णी (शहर) प्रतिनिधी, केळापूर,दारव्हा, नेर, पुसद (शहर) प्रतिनिधी, बाभुळगाव, महागांव (शहर ) प्रतिनिधी, मारेगांव, वणी

**वाशिम**
कारंजा, मंगरुळपीर, मानोरा, मालेगाव, रिसोड

**अकोला**
अकोट (शहर) प्रतिनिधी
तेल्हारा, बाळापूर, पातूर, हिवरखेड, बार्शीटाकळी

**बुलढाणा**
चिखली, देउळगांव राजा, जळगाव, जामोद, मलकापूर, मोताळा, नांदुरा, खामगाव, शेगांव, मेहकर, सिंदखेड राजा, लोणार

**वर्धा** | आष्टी, देवळी, सेलू, आर्वी, समुद्रपूर, कारंजा, घाडगे

**चंद्रपूर** | भद्रावती शहर प्रतिनिधी, वरोरा, चिमूर, नागभीड, ब्रम्हपुरी, सिंदेवाही, मुल, गोंडपिपरी, राजुरा, सावली, कोरपना, जिवती

मुख्य संपादक
**माधव आ. हिवाळे**
मो.नं. 9765332897
epaper.bharatsangram.online